दैनिक
रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...
# लक्ष महाराष्ट्र
www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com RNI No.MAHMAR/2019/79184
नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित
धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ५ वे | अंक : ३० वा | मंगळवार दि. ५ डिसेंबर २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स, धुळे

आजपासून शुभारंभ
नागपूर, अमरावती, अकोला
लग्न समारंभासाठी व शैक्षणिक सहलीकरिता 2x2 आकर्षक बसेस भाडेतत्वावर मिळतील.
2x1 A/C स्लीपर कोच
लगेज व पार्सलची उत्तम व्यवस्था
डेली सर्व्हिस - सांगली, सातारा, कोल्हापूर
वेळ - १०:३० ते १०:४५ पर्यंत
संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896
दु.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे

## न्यूज कॉलम

### ट्रकच्या धडकेत सायकलस्वार ठार

**धुळे ।** भरधाव वेगातील ट्रकने सायकलस्वारास धडक दिल्याने झालेल्या अपघातात सायकलस्वार ठार झाल्याची घटना सुरत बायपासरोडवर घडली. रविंद्र भटु अहिरे रा.गुरूकृपा नगर,याने दिलेल्या फिर्यादीनुसार, सुरत बायपास रस्त्यावरील सेवादास मंदीराजवळुन काका मोहन मंगल अहिरे हे सायकलीने जात असताना मागावुन आलेल्या भरधाव वेगातील ट्रक क्र. आर.जे.१९/जी.एच.३६७२ ने जोरदार धडक दिली. या अपघातात काका मोहन अहिरे गंभीर जखमी होवुन मरण पावले.

### सिलिंडरचा भडकेत महिलेचा मृत्यू

**धुळे ।** गॅस सिलिंडरच्या भडक्याने गंभीर भाजल्याने महिलेचा मृत्यू झाल्याची घटना पाष्टे (ता. शिंदखेडा) येथे घडली. वैशाली दिलीप कोळी (वय ३५) असे मृत महिलेचे नाव आहे. २६ ऑगस्टला सायंकाळी साडेपाचच्या सुमारास वैशाली कोळी या घरात स्वयंपाक करत असताना गॅस सिलिंडरला गळती लागून भडका उडाला. त्यात त्या गंभीर भाजून जखमी झाल्या. त्यांना उपचारासाठी धुळ्यात हिरे शासकीय रुग्णालयात दाखल केले. तेथे उपचारादरम्यान १८ सप्टेंबरला त्यांचा मृत्यू झाला. याबाबत नरडाणा पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद झाली.

# आझाद समाज पार्टीचे धुळ्यात चक्काजाम आंदोलन; वाईन शॉप हटविण्याची मागणी

**धुळे । प्रतिनिधी**

साक्री तालुक्यातील विटाई गावातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास तत्काळ प्रशासकीय मान्यता द्यावी, यासह विविध मागण्यांसाठी आझाद समाज पार्टीतर्फे शहरातील संतोषी माता चौकात रास्तारोको आंदोलन करण्यात आले.

संघटनेचे कार्याध्यक्ष आनंद लोंढे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात विटाई ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. जिल्हाधिकारी आणि पोलिस प्रशासनाला मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

त्यानुसार विटाई येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास प्रशासकीय मान्यता द्यावी, विटाई गावातील गट नं. कुप नं. २३३ पैकी ५ एकर १५ गुंठे प्रत्येकी वनजमीन अनु. जाती, जमाती यांच्या नावे करावी. विटाई गावातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासाठी मंजुर झालेल्या जागेलगत असलेली मुतारी योग्य ठिकाणी हलवावी. तसेच धुळेयेथील मध्यवर्ती बसस्थानजवळील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळील विनोद वाईन्स शॉप त्वरीत स्थलांतरीत करावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. १४ डिसेंबरपर्यंत मागण्या मान्य झाल्या नाही तर १५ डिसेंबर रोजी दुपारी १२ असा इशाराही देण्यात आला आहे.रास्तारोको आंदोलनात आनंदलोंढे यांच्यासह जिल्हाध्यक्ष आबा अमृतसागर, मुकुंदराव शिरसाठ, समाधान झाल्टे, कुलभुषण वाघ, महेंद्र सोनवणे व ग्रामस्थ सहभागी झाले होते.





### प्रशासनाविरोधात घोषणाबाजी

यावेळी संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते आक्रमक झाल्याचे बघावयास मिळाले. आक्रमक झालेल्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना पोलिसांनी तात्काळ ताब्यात घेतले असून यावेळी आझाद समाज पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी प्रशासनाच्या विरोधात मोठ्या प्रमाणात घोषणाबाजी करत आपला निषेध व्यक्त केला आहे.

### आंदोलकांना पोलिसांनी घेतले ताब्यात

धुळे शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या अगदी मागील बाजूस असलेले वाईन शॉप तेथून हटवण्यात यावे. त्याचबरोबर विटाई या गावातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास परवानगी मिळावी. तसेच बाबासाहेबांच्या पुतळासाठी विटाई येथे शासनातर्फे देण्यात आलेल्या जागेजवळील सार्वजनिक मुतारीची जागा बदलण्यात यावी; या मागण्यांसाठी आझाद समाज पार्टीच्यावतीने आज धुळ्यात चक्काजाम आंदोलन करण्यात आले आहे.

# लोखंडी पत्रे तयार करण्याच्या बनावट कारखान्यावर कारवाई



**धुळे । प्रतिनिधी**

शहरातील शंभर फुटी रोड परिसरात जिंदाल कंपनीच्या नावाने लोखंडी पत्रे तयार करून त्यांची विक्री करणाऱ्या मिनी कारखान्यावर एलसीबीच्या पथकाने छापा टाकाला. या कारवाईत सुमारे २५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच एकाला ताब्यात घेण्यात आले आहे. शहरातील शंभरफुटी रोडवरील स्मार्ट स्टील या ठिकाणी जिंदाल कंपनीचे बनावट पत्रे तयार करून ग्राहकांची फसवणूक केली जात असल्याची माहिती माहिती एलसीबीला मिळाली होती. मुख्तार खान शहाबाज खान ( रा. गरीब नवाज कॉलनी, धुळे ) असे त्याचे नाव आहे. त्याच्याकडे विचारणा केल्यावर त्याने बनावट पत्रे तयार केली जात असल्याची कबुली दिली. कारवाईत साधारण पत्र्याला आकार देणारे मशीन, त्यावर जिंदाल कंपनीचे नाव छापणारे अन्य एक मशीन, तयार केलेले बनावट पत्रे, प्रत्येकी ७० किलो वजनाचे ८६ गठ्ठे जप्त करण्यात आले. तसेच १२० किलो वजनाचे २४, १५० किलो वजनाचे ६५, २०० किलोचे ११ असे असे एकूण २ हजार ८५० किलो वजनाचे १८६ पत्र्यांचे गठ्ठे जप्त करण्यात आले आहे. त्यांची एकत्रित किंमत २४ लाख ३२ हजार ५०० रुपये आहे. एलसीबीचे निरीक्षक दत्तात्रय शिंदे, उपनिरीक्षक बाळासाहेब सूर्यवंशी, अमरजीत मोरे, कर्मचारी मच्छिंद्र पाटील, संदीप सरग, शोएब बेग, राजू गीते यांच्या पथकाने ही कारवाई केली. या प्रकरणी पुढील तपास सुरू असल्याचे सांगण्यात आले.

# 'ब्लड फॉर बाबासाहेब' अभियानांतर्गत धुळ्यात महापरिनिर्वाणदिनी रक्तदान शिबीर

**धुळे । प्रतिनिधी**

विश्र्वरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने महारक्तदान शिबिर आंतराष्ट्रीय अभियान ६ डिसेंबर २०२३ ला देश विदेशात एकाच दिवशी एकाच वेळीं अमेरिका, यूरोप, कॅनडा, न्युजिलेंड, यूएई, ऑस्ट्रेलिया व भारतातील आणी महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्यात एकाच वेळेस रक्तदान शिबिराचे आयोजन होत आहे. धुळे जिल्ह्यातुन देखील महारक्तदान शिबिराचे आयोजन करून डॉ.बाबासाहेबांना अभिवाद करण्यात येणार आहे.




यासंदर्भात नियोजन करण्यासाठी धुळे बस स्टँड जवळ असलेल्या संदेश भूमी येथे सदर रक्तदान शिबिरा विषयी झालेल्या बैठकीत चर्चा व ठिकाण ठरविण्यात आले, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जेल रोडवरील पूर्णाकृती मध्यवर्ती पुतळा,धुळे शहर पोलिस स्टेशन जवळ रक्तदान शिबिर घेण्यात येणार आहे. असे बैठकीत सर्वानुमते ठरले. ६ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत रक्तदान सुरूच राहणार आहे. रक्तदार शिबिराचे उदघाटन डॉ. कृष्णमोहन सैंदाणे यांच्या हस्ते होणार आहे. तरी जास्तीत जास्त रक्तदात्यांनी रक्तदानास उपस्तिती राहून उपकृत करावे असे आवाहन ब्लड फॉर बाबासाहेब आंतरराष्ट्रीय अभियानाचे धुळे जिल्हा संयोजक तथा करून सोशल ब्लड डोनर ग्रुपचे अध्यक्ष डॉ. शरद भामरे यांनी केले आहे.

### सार्वजनिक उपद्रव; हॉटेलचालकावर गुन्हा

**धुळे ।** सार्वजनिक जागी उपद्रवाची पुनरावृत्ती केल्याप्रकरणी हॉटेलचालकाविरुद्ध सोनगीर (ता. धुळे) पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. सिराज सलीम खाटीक यांच्या फिर्यादीनुसार पवन सुधाकर देसले (रा. देवभाने, ता. धुळे) याने देवभाने फाट्यावर त्याच्या हॉटेल व्यवसायातील चहाचे कप, निरुपयोगी कागद रस्त्यावर सार्वजनिक ठिकाणी फेकले. यासंबंधी त्याला सार्वजनिक उपद्रवाची पुनरावृत्ती न करण्याबाबत लेखी समज दिल्यानंतरही त्याने नियमांचे उल्लंघन केले. त्यावरून गुन्हा दाखल झाला.

# सटाणा- पिंपळनेर रस्त्याच्या अर्धवट कामामुळे तरुणाचा अपघाती मृत्यु

### आणखी किती बळी घेणार, सुस्त प्रशासन लक्ष देईल का ?

**पिंपळनेर । प्रतिनिधी**



देशीरवाडेजवळ अपूर्ण कामामुळे झालेल्या खड्ड्यात मोटारसायकल गेल्याने अपघात झाला. त्यात गंभीर जखमी झाल्याने एकाचा जागीच मृत्यू, तर अन्य एक गंभीर झाल्याची घटना घडली. अर्धवट कामामुळे अपघाती मृत्युचे प्रमाण वाढले असून सुस्त प्रशासन आणखी किती बळी घेणार, असा प्रश्र्न उपस्थित होत आहे.

विंचूर- प्रकाशा महामार्गाचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ करत असून गेल्या चार ते पाच वर्षापासून ते संथ गतीने सुरू आहे. अनेक ठिकाणी सटाणा ते सामोडे चौफुलीपर्यंतचे काम अर्धवट असल्याने रोजची अपघाताची मालिका सुरू आहे. त्यात तरुणांसह अनेकांचा बळी गेला तर काहींना अपंगत्व आले आहे. त्याची प्रचिती कालच्या अपघाताने पुन्हा आली. काल रात्री साडेदहाच्या सुमारास उंभरे येथील तरुण सचिन दिलीप भामरे, त्याचा मित्र कामानिमित्त पिंपळनेर येथे जात होते. देशीरवाडे जवळ उजव्या कालव्यालगत अपूर्ण कामामुळे असलेल्या खड्ड्यात मोटारसायकल गेल्याने अपघात झाला. त्या गंभीर जखमी होऊन सचिन भामरेचा जागीच मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला. रस्त्याचे काम अर्धवट असल्याने वाहने चालवी त्यांना नेमका अंदाज येत नाही. शेलबारी कडून वाहने जोरात येतात, अचानक पुढे अपूर्ण काम असल्याने गोंधळून अपघात होतात, काल रात्रीही झालेला अपघात नेमका याचमुळे झाल्याचा अंदाज आहे. सचिन भामरे उत्तमराव पाटील महाविद्यालयात द्वितीय वर्ष विज्ञानला शिकत होता, त्याच्या मृत्यूने हळहळ व्यक्त होत आहे.

वारंवार होणाऱ्या अपघातामुळे मार्गाचे काम करणाऱ्या ठेकेदारावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल व्हावा, अशी मागणी उंभरे ग्रामस्थांनी केली आहे. ठेकेदारावर कारवाई व्हावी, व रस्त्याचे अर्धवट काम त्वरित पूर्ण करावे, अशी मागणी होत आहे. तसेच जे. टी. पॉईंट ते सामोडे चौफुलीचे काम ही शहरातील अतिक्रमण धारकांमुळे होत नाही,तेथेही खड्डे व धुळीचे साम्राज्य असून व्यावसायिक व रहिवाशी श्र्वसनाच्या आजाराने ग्रस्त झाले आहेत.

# मंत्री छगन भुजबळ यांच्या प्रयत्नांतून येवला चिचोंडी औद्योगिक वसाहतीतील बायपास रस्त्याचे ३२ कोटीचे काम मंजूर

नाशिक श्र प्रतिनिधी

राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या प्रयत्नांतून येवला तालुक्यातील चिचोंडी येथे औद्योगिक वसाहत विकसित करण्यात आली आहे. या औद्योगिक वसाहतीत मुख्य रस्त्यापासून वाहतुकीसाठी अंगणगाव ते चिचोंडी औद्योगिक वसाहत या बायपास रस्त्याच्या कामासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून प्रशासकीय मान्यता मिळाली असून यासाठी एकूण ३२ कोटी ४ लाख रुपये इतका निधी मंजूर करण्यात आला आहे.



येवला मतदारसंघातील नागरिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात या दृष्टीने मंत्री छगन भुजबळ यांच्या प्रयत्नांतून येवला चिचोंडी येथे औद्योगिक वसाहत विकसित करण्यात आली आहे. या औद्योगिक वसाहतीमध्ये पाणी, वीज, सांडपाणी व्यवस्था, अंतर्गत रस्ते यासह आवश्यक त्या सर्व पायाभूत सुविधा विकसित करण्यात आल्या असून याठिकाणी काही लघु उद्योग देखील सुरु झाले आहे. या ठिकाणी अधिकाधिक उद्योग वाढावे व त्यासाठी वाहतूक सुरळीत व्हावी यासाठी मंत्री छगन भुजबळ यांच्या प्रयत्नांतून अंगणगाव ते चिचोंडी औद्योगिक वसाहतीला जोडणाऱ्या स्त्याच्या कामाला मंजुरी मिळाली आहे.

चिचोंडी औद्योगिक वसाहतीसाठी मंजूर करण्यात आलेल्या रस्त्यामुळे येथील उद्योजकांना आपल्या मालाची वाहतूक करण्यासाठी दळणवळणाच्या चांगल्या सुविधा उपलब्ध होणार आहे. परिणामी औद्योगिक वसाहतीतील उद्योग वाढीस चालना मिळून चिचोंडी औद्योगिक वसाहतीचा अधिक विकास होणार आहे.

### वलवाडीमध्ये दुर्गंधीयुक्त गढूळ पाणी

**धुळे ।** शहरातील वलवाडी परिसरात काही दिवसांपासून दूषित, दुर्गंधी युक्त, गढूळ पाण्याचा पुरवठा होतो आहे. या विषयी नगरसेवकांनी तक्रार केल्यानंतरही समस्या सुटलेली नाही.



शहराच्या वलवाडी परिसरासाठी स्वतंत्र पाणीपुरवठा योजना आहे. नकाणे तलावातील पाणी या योजनेच्या माध्यमातून पुरवले जाते. पण काही दिवसांपासून या भागात गढूळ पाण्याचा पुरवठा होतो आहे. पाण्याला दुर्गंधी येत असल्याने हे पाणी पिण्याच्या लायक नाही. परिसरात रविवारीही गढूळ पाणीपुरवठा झाला. पाणी काही वेळ बादलीत ठेवल्यानंतर तळाशी गाळ जमा होत होता. या भागात पाच दिवसांनंतर पाणीपुरवठा होतो. त्यामुळे नागरिकांना पाणी साठवून ठेवावे लागते.

# किसान काँग्रेसच्या शेतकरी संवाद यात्रेच्या जाहिर सभेचे आज भोकरला आयोजन

**धुळे । प्रतिनिधी**

राज्यात सरसकट दुष्काळ जाहिर करण्यात यावा,पिकविम्याची रक्कम तातडीने मिळावी,सोयाबीन,कापूस,धान पिकांसह सर्व पिकांची हमीभाव खरेदी केंद्र सुरु करण्यात यावेत, जंगली प्राण्यांमुळे नुकसान झालेल्या शेतपिकांसाठी विशेष पीकविमा लागू करावा या व इतर मागण्यांसाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अंतर्गत प्रदेश किसान काँग्रेसच्यवतीने नंदुरबार ते नागपूर किसान संवाद यात्रेचे मंगळवार दि.५डिसेंबर रोजी आगमन होत आहे. त्याअनुंषगाने महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष आ.कुणाल पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आज दि.५डिसेंबर रोजी भोकर ता.धुळे येथील शिवरत्न मंगल कार्यालयात जाहिर सभेचे आयोजन करण्यात आले आहे.



लामकानी,चिंचवार,नवलाणे, मेहेरगाव,निमडाळेमार्गे गोंदूरपर्यंत वाहनाने येणार असून तेथून गोंदूर ते भोकरपर्यंत पदयात्रा काढण्यात येणार आहे. त्यानंतर संध्याकाळी ६ वा.आ.कुणाल पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जाहिर सभा होणार आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र प्रदेश किसान काँग्रेसचे अध्यक्ष पराग पाष्टे,माजी खा.बापू चौरे,माजी आ.डि.एस.अहिरे,प्रदेश सचिव युवराज करनकाळ,श्री रणजित पावरा आदी उपस्थित राहणार आहेत.धुळे जिल्हयातील शेतकरी,सर्व काँग्रेस आघाडी,सेलचे पदाधिकारी,जि.प., पं.स.सदस्य, नगरसेवक,कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# तरुणाईला गुंडांचे आकर्षण का वाटतंय?

कधी काळी शांत म्हणून ओळखल्या जाणार्या धुळ्यात गुन्हेगारीमुळे गढूळ झालेले आहे. सराईत गुन्हेगारांवर पोलिसांची नजर असते आणि कारवाईही होते; मात्र १८ ते २२ वर्षे वयोगटातील तरुणांचा लहानमोठ्या गुन्ह्यांमधील सहभाग वाढतोच आहे.

गेल्या काही काळात सर्वच भागांत पेटी क्राइम, म्हणजे किरकोळ गुन्हेगारी फोफावली असून, त्यांत प्रामुख्याने विशी- बाविशीतील तरुणांचा सहभाग दिसतो

आहे. महानगराच्या अनेक भागांत हॉटेल व्यावसायिकांना-दुकानदारांना धमकावणे, खंडणी उकळणे, शस्त्रे हाती घेऊन दहशत माजविणे, गाड्यांची तोडफोड-जाळपोळ करणे, मारहाण करणे, प्राणघातक हल्ले करणे अशा गुन्ह्यांची संख्या वाढल्याने, तेथील नागरिकांत दहशतीचे वातावरण आहे. अनेक गुन्ह्यांमध्ये चाकू, सुरे, कोयत्यांपासून पिस्तुल, रिव्हॉल्व्हर यांसारख्या शस्त्रांचा वापर झाला असून, कोवळ्या तरुणांकडे ही शस्त्रे येतात कोठून, हा प्रश्न आहे. गल्लोगल्लीजन्म घेत असलेल्या या संभाव्य भाईंना रोखणे, हे फक्त पोलिस नव्हे, तर सार्या समाजापुढील मोठे आव्हान आहे. दरम्यान, या सगळ्यात पोलीस हे मोठ्या प्रमाणात अपयशी ठरत असल्याचं दिसत आहे. तरुणाईमध्ये एक जबरदस्त उर्जा असते त्याचा उपयोग हा विधायक कामांसाठी करुन घ्यायचा असतो. पण तरुण ज्या पद्धतीने गुन्हेगारी क्षेत्राकडे वळत आहेत ते पाहता पुण्यातील पोलीस हे तरुणांना योग्य मार्गाकडे वळवण्यात अपयशी ठरल्याचं आढळून आलं आहे. मात्र, असं असलं तरीही अद्यापही वेळ गेलेली नाही. इच्छाशक्ती ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. पाहूयात यापुढे धुळ्यातील गुन्हेगारी कमी करण्यात पोलिसांना यश येतंय की, पूर्वीप्रमाणेच हजारो तरुण हे गुन्हेगारीकडे वळतात..




### दुचाकीवर गुंडांच्या ग्रुप्सची नावे

विविध गुन्हेगारांचे ग्रुप्स आणि त्यांच्यातील वर्चस्वात कळत-नकळत युवक ओढले जातात. अनेकांच्या दुचाकीवर गुंडांच्या ग्रुप्सची अद्याक्षरे झळकताना दिसतात. वर्चस्वातून एकमेकांची कॉलर पकडणारेच पुढे हातात शस्त्र घेऊन अंगावर धावून जातात. कॉलेजमधील ग्रुप्स मोडीत काढण्याची आज खरी गरज आहे. शाळा, कॉलेजच्या बाहेर टवाळकी करणार्या वेळीच पकडून त्यांच्या पालकांपुढे हजर केले पाहिजे. पोलिस दलाच्यावतीने होणारी कारवाई पुरेशी नसून कॉलेज प्रशासनाने देखील कारवाईस हातभार लावला पाहिजे.



### गुंडांकडील ब्रँडेड वस्तू ते आलिशान गाड्यांची भुरळ

आर्थिक सुबत्ता वाढत असताना काही गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी हे बदल हेरुन आपली पोळी भाजण्याचा प्रयत्न केला. पण हे ही लोकं फक्त एवढ्यावरच थांबली नाही तर काही तरुण मुलांना हाताशी धरुन त्यांनी चुकीच्या पद्धतीने पैसा कमवण्यास सुरुवात केली. यामुळे हळूहळू येथील गुंडांना एक प्रकारचं वलय निर्माण झालं. त्यातूनच वेगवेगळ्या टोळ्यांचा उदय झाला. याच टोळ्यांचे अनेक दादा हे नंतर मोठमोठ्या बॅनरवर झळकू लागले. ब्रँडेड वस्तू, आलिशान गाड्या.. शेकडो लोक मागे-पुढे असणं याच गोष्टी तरुणांना आकर्षित करु लागल्या. हळूहळू शहरी भागाप्रमाणेच ग्रामीण भागातील तरुण देखील या सोन्याच्या पिंजऱ्याकडे आकर्षित होऊ लागला आणि नंतर याच भोवऱ्यात ते दिवसेंदिवस अडकत आहेत.

# हॉटेलात जुगार खेळणाऱ्यावर एलसीबीची कारवाई

**धुळे । प्रतिनिधी**

शहरातील चाळीसाव चौफुलीजवळील हॉटेल कुणाल श्रीकृष्ण लॉजिंगमधील एका बंद खोली रंगलेला जुगाराचा खेळ एलसीबीने छापा टाकत उधळून आला. हॉटेल चालक तर फरार झाला. मात्र दहा जुगारींना रंगेहातपकडण्यात आले. त्यांच्याकडून कार, दुचाकीसह सुमारे ९ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



चाळीसगावचौफुली जवळील हॉटेल कुणालश्रीकृष्ण लॉजिंग येथे एका बंद खोलीत हॉटेल चालक गणेशशिंगाडे हा त्यांच्या देखरेखीखाली ५२ पत्याच्या कॅटवर स्वत:च्याफायद्यासाठी हारजितचा जुगाराचाखेळ खेळत व खेळवित असल्याची गुप्त माहिती एलसीबीचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे यांना मिळाली. त्यानुसार त्यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यरात्री स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तेथे छापा टाकला. तेथे जुगारा खेळतांना दहा जण मिळून आले. तर हॉटेल चालक गणेश शिंगाडे हा पसार झाला. तेथून रोकडसह जुगाराचे साहित्य, मोबाईल, मोटार सायकली व चारचाकी वाहन असा एकुण ८ लाख ८५ हजार ९७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

## काँग्रेसला थप्पड


गेल्या वेळी मध्य प्रदेशातील सत्ता काँग्रेसने पक्षफुटीमुळे गमावली. राजस्तानात आता सत्ता होती. तरीही पूर्वीच्या जागाही टिकवण्यात पक्षाला अपयश आले. त्याचे वस्तुनिष्ठ परीक्षण काँग्रेस करणार का?

मध्य प्रदेश भारतीय जनता पक्ष गमावणार अशी हवा असताना तेथे पक्षाने सत्ता राखली. छत्तीसगढमध्ये काँग्रेस पुन्हा सत्तेत येण्याची शक्यता वर्तवली जात असताना तेथे भाजपने काँग्रेसला धक्का दिला. राजस्तानात दर पाच वर्षांनी सरकार बदलण्याची परंपरा तोडण्यात काँग्रेसला अपयश आले. महत्त्वाच्या राज्यांत काँग्रेसची जबर पीछेहाट झाली आहे. त्या मागचे मोठे कारण काँग्रेस हेच आहे. आगामी लोकसभा निवडणुकी आधीच्या या विधानसभा निवडणुकांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले होते. जनतेचा कल त्यातून दिसणार हे माहीत असूनही काँग्रेसने या निवडणुका फार गांभीर्याने घेतल्या नाहीत, असे जाणवत आहे. छत्तीसगढ व मध्य प्रदेशात जिंकू; पण राजस्तानात चुरस आहे अशा आशयाचे विधान पक्षाचे नेते राहुल गांधी यांनी केले होते. त्यांचा अंदाज साफ चुकला आहे. काँग्रेसने प्रचारात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लक्ष्य केले ही त्यांची मोठी चूक होती. भाजपने 'मोदी के मन में एमपी, एमपी के मन में मोदी' अशी घोषणा करून डाव उलटवला. निवडणुकांचा एक टप्पा पार पडल्यानंतर मोदी यांनी मोफत धान्य योजनेस पाच वर्षे मुदतवाढ जाहीर केली. मतदारांना आकर्षित करण्यास ती उपयोगी ठरली. या विषयी 'केसरी'ने या स्तंभात विश्लेषण केले होते ('रेवडी माझी-त्याची', केसरी ९ नोव्हेंबर २०२३)

मध्य प्रदेशात 'कल्याणकारी योजनां'चे युद्ध झाले. 'लाडली बहन' लाडली लक्ष्मी' या योजनांच्या आधारे भाजपने महिला मतदारांना आपल्याकडे खेचले. त्याला काँग्रेसकडे उत्तर नव्हते. राज्य जिंकले आहे व आपण मुख्यमंत्री होणार अशा भ्रमात काँग्रेस व प्रदेशाध्यक्ष कमल नाथ राहिले. प्रचार सभांचा फार उपयोग होत नसतो, रस्त्यात उतरून, घरोघरी जाऊन काँग्रेसने प्रचार केल्याचे दिसले नाही. शिवराज सरकारच्या काळात गैरव्यवहारांचे अनेक आरोप झाले. ते जनतेपर्यंत पोहोचवण्यात काँग्रेस अपयशी ठरली. प्रचाराची जबाबदारी त्यांनी उमेदवारांवरच सोपवल्याचे दिसत होते. गेल्या वर्षापासून मोदी व अमित शहा यांनी या निवडणुकांची आखणी केली. बंडखोरांचा उपद्रव होणार नाही याची काळजी घेतली. तशी खबरदारी काँग्रेसने दोन्ही राज्यांत घेतली नाही. मध्य प्रदेशात काँग्रेस पूर्वी अनेक वर्षे सत्तेत होती. ती परत का मिळत नाही याची कारणमीमांसा त्यांनी केली नाही. राजस्तानात सरकार बदलाचा कल १९९३ पासूनचा आहे. अनेक कल्याणकारी योजना राबवूनही तेथे सत्ता राखण्यात काँग्रेसला अपयश आले. याचे कारण सचिन पायलट व अशोक गेहलोत यांच्यातील भांडण. पायलट यांना मानणारा युवा वर्ग नाराज होऊन काँग्रेसपासून दूर गेला हेही एक कारण आहे. निवडणुकीला 'गेहलोत विरुद्ध मोदी' अशा संघर्षाचे स्वरूप प्राप्त होणे राजस्तानात काँग्रेसला नडले. भाजपने तेथे गटबाजी नियंत्रणात ठेवली. छत्तीसगढमध्ये काँग्रेसने अनेक कल्याणकारी योजना राबवल्या. पण, निवडणुकीपूर्वी अंमलबजावणी संचालनालयाने महादेव ॲप गैरव्यवहार उघड केला व त्यात भूपेश बघेल यांना गोवले. त्यामुळे त्यांना सत्ता गमवावी लागली. ही केंद्र सरकारची खेळी होती हे उघड आहे. कारण मतदानानंतर या ॲपच्या बातम्यांचा मागमूसही आढळत नाही. तेलंगणात बीआरएसच्या कारभारास जनता कंटाळली होती, असे अनुमान काढता येते. तेथील विजय काँग्रेसला थोडा दिलासा देणारा आहे. त्यामुळे पक्षात धुगधुगी असल्याचे दिसते, त्याने पक्षाला चैतन्य मिळणे अवघड आहे.आदिवासी, दलित, अन्य मागास वर्ग या गटांत काम करणार्या संघ परिवारातील अनेक संस्था भाजपच्या बाजूने जनमत तयार करत असतात. तशा संस्था व संघटना काँग्रेसने कधी निर्माण केल्या नाहीत. मल्लिकार्जुन खर्गे काँग्रेसचे अध्यक्ष असले, तरी ते देश पातळीवरील सर्वमान्य नेते नाहीत. राहुल व प्रियांका यांना राजकीय नेते म्हणावे का हा प्रश्न ताज्या निकालाने अधोरेखित होतो. भाजपचे दोष त्यांना दाखवता आले नाहीत आणि भाजपला ठाम उत्तर देण्यासाठी स्वतंत्र प्रतिमा तयार करण्यातही काँग्रेसला अपयश आले आहे. त्याचे फळ त्यांना मिळाले आहे.

## शहराकडे चला ह्या महामंत्राचे प्रचारक साहित्यिक प्रा.डॉ.शंकरराव बोऱ्हाडे

शहराकडे चला हा भारतीय ग्रामीण जनतेला डॉक्टर बाबासाहेब आंबडकरांनी १०० वर्षापूर्वी दिलेल्या महामंत्र चा जीवनभर प्रचार करणारे साहित्यिक डॉ शंकरराव बोऱ्हाडे सरांचे मागील रविवारी दुःखद निधन झाले .साधारण वीस दिवसापूर्वी त्यांचा मला फोन आला की मला फार थकवा जाणवतो म्हणून मी त्यांना सुयेश हॉस्पिटलच्या डॉ दुबे कडे दाखवले. डॉ दुबेंनी सोनोग्राफी करायला सांगितली. डॉ मनोज शिपींनी सोनोग्राफी केली व इतरही तपासण्या झाल्या, आजारपण उपचारापलीकडचे होते. गेले ते दिवस शंकरराव बोऱ्हाडे सर धैर्याने आजारपणाला सामोरे गेले आणि आज त्यांचे निधन झाले .



सरांचे बालपण सिन्नरमध्ये गेले. अतिशय हलाक्याच्या परिस्थितीत त्यांचे शालेय शिक्षण झाले. त्यांचे वडील तमाशात काम करायचे. त्यांना शिक्षणाची आवड होती.

सिन्नरलाच त्यांना शाळेत शिपायाची नोकरी मिळाली. त्याच काळात त्यांचा प्रेमविवाह झाला. त्यानंतर त्यांना नाशिकला बदली मिळाली. योगायोगाने शाळेत क्लर्क ही जागा रिकामी झाली. कार्यक्रमानिमित्त तात्यासाहेब शाळेत आलेले होते, त्यांनी संस्था चालकांकडे शब्द टाकला आणि शंकरराव बोऱ्हाडे क्लर्क झाले. शंकरराव बोऱ्हाडे क्लर्क झाल्यावर त्यांनी शिक्षण सुरूच ठेवले आणि ते शिक्षक, प्राध्यापक, पीएचडी, पीएचडीचे गाईड असा त्यांचा आयुष्यातील शिक्षण क्षेत्रातील प्रवास राहिला. रयत शिक्षण संस्थेत तसेच मराठा विद्या प्रसारक संस्थेत हे मराठीचे प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. कोविड च्या आधी निवृत्त झाले.

वाचन ,लेखन हे त्याचे आवडीचे विषय होते .सुरुवातीला त्यांनी पत्रकारीताही केली .संपूर्ण महाराष्ट्रातील साहित्यिक चळवळीशी त्यांचा जवळचा संबंध होता. त्यांनी मरणगाथा (कवितासंग्रह), कडा आणि कंगोरे (व्यक्तीचित्र संग्रह), उजेडाचा आधीचा काळोख (ललित) ,देशभक्त शेषराव गाडगे (चरित्र), विडीची गोष्ट (उद्योगाचे चरित्र) साहित्य प्रसिद्ध झाले व दोन पुस्तकांवर ते काम करीत होते. त्यांना अनेक साहित्य पुरस्कार मिळाले. सार्वजनिक वाचनालय नाशिक चे विश्वस्त म्हणून त्यांनी उत्तम काम केले. लोकहितवादी मंडळाचे ते विश्वस्त होते. मागील वर्षी स्थापन झालेल्या मसापा जलालपूर शाखेचे ते अध्यक्ष होते. डॉ वसंतराव पवार चरित्र ग्रंथाचे संपादकीय काम त्यांनी केले. सतत नवीन लिहिणाऱ्यांना प्रोत्साहन दिले. अनेक ठिकाणी धडपडणाऱ्या युवकांसाठी, नोकरी करता शब्द टाकला .दोन वर्षांपूर्वी नाशिक येथे झालेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे ते कार्यवाह होते. त्यांनी उत्कृष्ट समन्वयातून संमेलन यशस्वी केले. संमेलनात यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या कार्याची दखल घेण्यासाठी लेख लिहिले व त्यांचे मनोबल वाढवले. संपूर्ण नाशिक जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्त्यांशी त्यांच्या जवळचा संबंध होता. विशेषता डाव्या चळवळीशी त्यांचा जवळचा संबंध होता. शाहू ,फुले, आंबेडकरांच्या विचाराचा वारसा त्यांनी पुढे नेला. ग्रामीण भागातील होतकरू तरुणांना शहरात आणून त्यांना आयुष्यात स्थिरस्थावर करण्याचे काम त्यांनी आयुषयभर केले. शहरा कडे चला या महा मंत्राचे ते खऱ्या अर्थाने प्रचारक होते. सामाजिक प्रश्नांवर ते अतिशय सफकल पणे लिहित. सर समाजातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या कार्याची दखल घेत ,त्यांच्यावर लेख लिहीत असत, त्यांना सतत प्रोत्साहित करत असत.



शब्द संवाद

प्राचार्य प्रशांत पाटील
(नाशिक) मो.९५११८५९९३९

सरांचा प्रेम विवाह अतिशय यशस्वी राहिला. त्यांच्या सौभाग्यवतींची साथ त्यांच्या सर्व साहित्यिक तसेच सामाजिक उपक्रमात त्यांना राहिली. त्यांचा चिरंजीव पत्रकारितेत स्थिरावला आहे. पुढील २५ वर्षात त्यांच्या हातून अतिशय उत्तम साहित्य निर्मिती होईल असं वाटत असताना आज अचानक प्रवास थांबला. त्यांच्या जाण्याने नाशिक जिल्हा उत्तम साहित्यिकास, उत्तम शिक्षकास मुकला आहे तसेच सामाजिक चळवळीचा मुख्य आधारस्तंभ आपल्यातून गेला आहे. माझ्या सामाजिक कामांची सतत दखल घेणारे, मला प्रोत्साहित करणारे, माझे जवळचे मित्र आपल्यातून गेले आहेत. सरांना भावपूर्ण श्रद्धांजली!

## नको अपंगत्वाचा शाप

याशिवाय विशेष विमानाने ते भोपाळला पोहोचत असल्याची माहितीही जिल्हाधिकारी-जिल्हा पोलिस प्रमुखांना देण्यात आली. यानंतर विमानतळावरील पत्रकारांना हाकलून देण्यात आले. अधिकारी विमान पोहोचत असलेल्या धावपट्टीच्या दिशेने गेले. अँडरसनला ताब्यात घेऊन जिल्हाधिकार्यांच्या गाडीतूनच सोबत नेण्यात आले. नंतर अटकेचा संशय आल्याने अँडरसन खाली गेला आणि सामानाबद्दल विचारू लागला. तत्कालीन जिल्हाधिकार्यांनी तुमचे सामान सुरक्षित आहे, असे सांगितले. अटकेनंतर अँडरसन आणि अन्य दोन लोकांना श्यामला हिल्स येथील युनियन कार्बाइडच्या गेस्ट हाऊसमध्ये आणण्यात आले. गेस्ट हाऊसमध्ये आणून त्यांना अटकेची माहिती देण्यात आली. यानंतर अँडरसनने विचारले की, मला काय करायचे आहे ? अधिकार्यांनी त्यांना सांगितले की, प्रत्येकाने स्वतंत्र खोलीत राहावे आणि कोणाच्याही संपर्कात राहू नये. तिघांनाही स्वतंत्र खोलीत ठेवण्यात आले होते. तसेच, तेथे पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. त्याच वेळी अटकेची बातमी समजताच कंपनीचे इतर अधिकारी गेस्ट हाऊस सोडून निघून गेले.

तत्कालीन जिल्हाधिकारी मोती सिंह आपल्या पुस्तकात लिहितात, होय, आमच्याकडून चूक झाली होती. अँडरसनला अटक केल्यानंतर ठेवण्यात आलेल्या खोलीत एक फोन होता. वेळेअभावी पोलिसांना खोलीची व्यवस्थित चौकशी करता आली नाही. अँडरसनने त्याच टेलिफोनचा वापर करून पळ काढला. अर्थात आता या सगळ्या घटना केवळ आठवणीस्वरुपात उरल्या आहेत. त्याला बराच काळ उलटून गेला आहे. मात्र तरीदेखील प्रत्येक गोष्टीचे होणारे राजकारण, लोकांच्या सुरक्षेप्रती अनास्था, कामातील अक्षम्य हलगर्जीपणा किती घातक आणि स्फोटक परिस्थिती निर्माण करतो हे या स्मृती सांगून जातात.

थोडक्यात, या दुर्घटनेने अनेकांचा जीव घेतलाच खेरीज पुढील अनेक पिढ्यांमध्ये अपंग निर्माण केले. त्यानंतर जन्मलेली काही मुले सव्यंग जन्माला आली. त्यांच्या करुण कहाण्यादेखील काळीज पिळवटून टाकणार्या आहेत. या आणि जन्मजात अपंगत्वामुळे वा कोणत्या ना कोणत्या अपघाताने अपंगत्व आलेल्या प्रत्येकासाठी या दिवशी साजरा होणारा 'दिव्यांग दिवस' महत्त्वाचा आहे. १९९२ पासून संयुक्त राष्ट्रसंघाद्वारे त्याचा प्रचार केला जात आहे. दिव्यांगांप्रती असणारी चुकीची भावना बदलण्यासाठी, सामाजिक कलंक दूर करण्यासाठी आणि त्यांच्या जीवनाचा दर्जा सुधारण्यासाठी तसेच अपंग लोकांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी त्यांच्या वास्तविक जीवनात विविध सहाय्यांचा प्रचार आणि अंमलबजावणी करणे हे यामागील प्रमुख उद्दिष्ट आहे. या दिवशी दिव्यांगांच्या प्रश्नांना तोंड फोडणारे, त्यांना मदत देऊ करणारे, रोजगारक्षम बनवणारे असे अनेक प्रकारचे कार्यक्रम, योजना पार पडतात. समाजातील अशा लोकांचा स्वाभिमान वाढवण्यासाठी, आरोग्य सुधारण्यासाठी आणि अधिकारांची जाणीव करुन देण्यासाठी एकत्र येणे तसेच अपंगत्वाच्या समस्येबद्दल जगभरातील लोकांची समज वाढवणे, असे उपक्रम राबवणे या निमित्ताने शक्य होते. जीवनाच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक अशा प्रत्येक पैलूमध्ये समाजातील अपंगांचा समावेश असतो. तो वाढावा या कारणास्तवही हा दिवस 'जागतिक अपंगत्व दिन' या नावाने साजरा केला जातो.


याचा इतिहास पाहायचा तर संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने आंतरराष्ट्रीय अपंग व्यक्तींच्या वर्षाची घोषणा केल्याचे दिसते. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि प्रादेशिक स्तरावर अपंग व्यक्तींचे पुनर्वसन, त्यांच्याविषयी चुकीच्या गोष्टींना प्रतिबंध, प्रोत्साहन आणि समान संधी यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी ही योजना तयार करण्यात आली होती. याद्वारे अपंग व्यक्तींच्या हक्कांबद्दल लोकांना जागरुक करून समाजात समानतेच्या विकासासाठी, सामान्य नागरिकांप्रमाणे त्यांच्या आरोग्याकडे लक्ष देणे आणि त्यांची सामाजिक-आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी संपूर्ण सहभाग आणि समानता निश्चित करण्यात आली. याचाच एक भाग म्हणून १९८३ ते १९९२ ही वर्षे संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेद्वारे अपंग व्यक्तींचे संयुक्त राष्ट्र दशक म्हणून घोषित करण्यात आली होती. त्याद्वारे सरकार आणि इतर संस्थांनी शिफारस केलेल्या सर्व योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी एक कालमर्यादा ठरवण्यात आली आणि त्याद्वारे दिव्यांगांसाठी अनेक कार्यकारी योजना आखण्यात आणि यशस्वीपणे राबवण्यात आल्या. आजही याच भावनेने हा दिवस साजरा केला जातो. जगभरातील लोक त्यांना समर्थन आणि प्रोत्साहन देण्यासाठी तसेच अपंगांच्या समान हक्कांप्रती सजग करण्यासाठी उत्साहाने योगदान देतात. हा दिवस दिव्यांगांनी त्यांच्या क्षमतांचे प्रदर्शन करण्यासाठी कला प्रदर्शनांचे आयोजन करूनही साजरा केला जातो. **समाप्त:**

## धार्मिक स्थळे म्हणजे पर्यटनस्थळे नव्हे हे सांगणारी 'वस्त्र संहिता'!

मनुष्य जसजसा माणूस बनू लागला, तसतसा त्याने स्वतःची प्रगती करण्यास सुरुवात केली. अन्न आणि निवाऱ्यासोबत त्याने वस्त्र ही आपली मूलभूत गरज बनवली. अन्नाचे रूपांतर वेगवेगळ्या पदार्थांमध्ये झाले, वेगवेगळ्या चवींचा शोध लागला. दगडांची गुहा एक सुंदर आलिशान घरात रूपांतरित झाली, तर झाडांची पाने, फांद्यांची वस्त्रे ताग्यापासून बनलेले कपडे बनले. या वेशभूषेत सुद्धा बदल झाले. त्यावर पृथ्वीवरील त्या त्या भागातील लोकसंस्कृती, पर्यावरणीय परिस्थिती, हवामान याचा परिणाम दिसून येऊ लागला. बर्फ पडणारे देश आणि कडक उन्हाचे वाळवंटी प्रदेश, मुसळधार पावसाचा परिसर या प्रत्येक ठिकाणी तेथील गरजेप्रमाणे वेशभूषा बनवली गेली. माणूस जसजसा प्रगत होऊ लागला, दळणवळण, संपर्क यात आमूलाग्र बदल झाला. तसतसा वेगवेगळ्या प्रदेशांनी विकसित केलेल्या वेगवेगळ्या कला, संस्कृती यांच्यात आदान-प्रदान होऊ लागले. आजच्या आधुनिक बोलीभाषेत ते कॉपी होऊ लागले. कॉपी केलेल्या या कला संस्कृतीवर मग स्थानिक कला संस्कृतीचा प्रभाव पडला आणि वेगवेगळ्या संस्कृतींचा मिलाफ घडत गेला. या आदान-प्रदान केलेल्या संस्कृतीचा समाजातील अनेक क्षेत्रांवर प्रभाव झालेला दिसून आला. तसा तो वेशभूषेवरही झालेला दिसून आला. पण एखाद्या गोष्टीचा अतिरेक हा होतोच. गेल्या काही शतकांमध्ये आधुनिकीकरणाच्या नावाखाली संस्कृती संवर्धनाऐवजी संस्कृतीवर कुरघोडी होताना दिसत आहे. अनेक पिढ्या जपलेली संस्कृती नष्ट होताना दिसत आहे आणि त्यात सर्वात मोठे आक्रमण झाले आहे ते वेशभूषेवर, परिधान केलेल्या कपड्यांवर. पाश्चात्यांचे अनुकरण या नावाखाली माणूस पुन्हा नग्नतेच्या दिशेने वाटचाल करू लागला आहे. हे सगळ लिहिण्यामागचे कारण म्हणजे सध्या 'वस्त्र संहिता' हा विषय संपूर्ण राज्यात गाजत आहे. मंदिर-संस्कृतीच्या रक्षणार्थ द्वितीय 'महाराष्ट्र मंदिर न्यास' परिषदेने गेल्या वर्षापासून या उपक्रमाला सुरुवात केली आहे. वेगवेगळ्या निवडणुकांमध्ये जशी आचारसंहिता लागू केली जाते, तशीच राज्यातील सर्व मंदिरात वस्त्र संहिता लागू करण्यासाठी महाराष्ट्र मंदिर न्यास महासंघ प्रयत्नशील असून त्यांच्या या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळू लागला आहे. खरं तर मंदिरे ही माणसाच्या आध्यात्मिक श्रीमंतीची प्रतीके आहेत. मनुष्य जगासाठी, स्वतःसाठी जगताना अनके अडीअडचणींचा सामना करत असतो. वेगवेगळ्या प्रसंगांना त्यांना सामोरे जावे लागते. अशा वेळी त्याचे भरकटलेले चित्त स्थिर करण्यासठी, मानसिक शांततेसाठी, आध्यात्मिक भावनेसाठी ही मंदिरे शक्तिस्थाने आहेत. मात्र गेल्या काही वर्षांमध्ये मंदिरे यांच्याकडे धार्मिक स्थळे होण्यापेक्षा पर्यटन स्थळे म्हणून बघितले जाऊ लागले आहे. पर्यटनाला जाणारा माणूस हा त्याची अनेक बंधने झुगारून, मोकळा-ढाकळा जातो, काही सामाजिक नियम बाजूला ठेवून रिलॅक्स होऊ पाहतो. पण मंदिरांमध्ये हा मोकळेपणा उपयोगी नसतो. धार्मिक स्थळांना भेट देताना काही नियम हे आवश्यक आहेतच. त्यामध्ये जसं आर्वाच्च स्वरातील संभाषणे नको, गोंधळ नको, डीजे-पार्ट्या नको तसेच पेहराव सुद्धा साधा असावा, त्याकडे पाहताना अन्य लोकांचे मन आणि चित्त भरकटू नये इतकी माफक अपेक्षा असते. धार्मिक स्थळामध्ये आपल्या दैवतेसमोर नतमस्तक होण्यासाठी आपण जातो, अशी ढोबळ समजूत आहे. पण धार्मिक स्थळांकडे सुद्धा पर्यटनस्थळ म्हणून पाहू लागल्याने हा सगळ्याच गोष्टींमध्ये गोंधळ निर्माण झाला आहे. देवळे, मंदिरांमध्ये जातानाही अपूर्ण, अयोग्य कपडे घालण्याचा ट्रेंड वाढू लागला आहे. असे चालते ही समजूत प्रबळ होत आहे आणि त्यामुळेच धार्मिक स्थळांचे पावित्र्य, उद्देश दूर होत आहेत. त्यामुळेच महाराष्ट्र मंदिर न्यास महासंघाने मंदिरांमध्ये 'वस्त्र संहिता' लागू करण्यासठी प्रयत्न सुरू केले आहेत. त्यासाठी राज्यातील लहान-मोठ्या मंदिर विश्वस्तांकडे जाऊन, प्रमुखांकडे जाऊन या वस्त्र संहितेचे महत्त्व पटवत आहेत. त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे, तर एकीकडे व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा आणल्याची ओरड केली जात आहे. मात्र 'देश तसा वेष' ही उक्ती महत्त्वाची आहे. त्यामुळे धार्मिक स्थळांकडे पर्यटनस्थळ म्हणून न बघता त्यांचे महत्त्व आणि पावित्र्य अबाधित ठेवलेच पाहिजे, यासाठी परिषद आग्रही आहे. कुठल्याही व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा न आणता याचे अनुकरण व्हावे यासाठी मंदिरांनी आग्रही राहावे, असे आवाहन केले जात आहे. शाळा, पोलीस, रुग्णालयांसह अनेक ठिकाणी वस्त्र संहिता लागू आहे, ही स्थळे जशी महत्त्वाची तशीच धार्मिक स्थळे महत्त्वाची असल्याने तेथेही योग्य वस्त्राचा नियम महत्त्वाचा आहे, असे महाराष्ट्र मंदिर न्यास महासंघाडून सांगितले जात आहे. मंदिरे ही हिंदू धर्माची आधारशीला आहेत. त्यातून मिळणाऱ्या ईश्वरी चैतन्यामुळेच आधुनिक काळातही समाज मंदिरांकडे आकर्षित होतो. त्यामुळे मंदिरांतील पावित्र्याचे रक्षण करणे, हे हिंदू समाजाचे दायित्व आहे. मंदिरातील देवतातत्त्व टिकवण्यासाठी मंदिरांत विधिवत पूजा-अर्चा करणे, प्राचीन मंदिर-संस्कृतीचे संवर्धन करणे, मंदिरांच्या समस्यांचे निवारण करणे, मंदिरात येणाऱ्या भाविकांसाठी सुविधा उपलब्ध करून देणे, दर्शनरांगांचे सुनियोजन करणे तसेच मंदिर परंपरांचे रक्षण करणे यासाठी मंदिरांचे विश्वस्त, पुजारी, भक्त आदींचे संघटन आवश्यक आहे. त्यासाठी श्री विघ्नहर गणपती मंदिर देवस्थान, लेण्याद्री गणपती मंदिर देवस्थान, श्री क्षेत्र भीमाशंकर देवस्थान, हिंदू जनजागृती समिती आणि महाराष्ट्र मंदिर महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने २ आणि ३ डिसेंबर २०२३ यादिवशी श्री विघ्नहर सभागृह, ओझर, जिल्हा पुणे येथे द्वितीय 'महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदे'चे आयोजन करण्यात आले आहे. यावेळीही 'वस्त्र संहिता' हा मुद्दा पुढे येणार असून त्याचे महत्त्व अधिक अधोरेखित होणार आहे.

**- दृष्टिक्षेप : अनघा निकम-मगदूम**

## शब्दकोडे-२५२



**आडवे शब्द**

१. तात्काळ, जागच्या जागी ५. मान्य, आवडते ८. हल, जमीन उकरण्याचे अवजार १०. एक सुगंधी वनस्पती १२. अनुमती, मान्यता १४. संन्याशांची राहण्याची जागा १६. थेट, सरळ १७. गुडघ्यावर पुढे सरकणे १९. गव्हाचे पीठ २०. युद्धभूमी २१. अकस्मात २३. सहा आसनी रिक्षा २६. जास्तीत जास्त २७. ताट २९. किंमत ३०. हात ३२. गांधारीपुत्र ३३. नाका ३४. चांगल्यासाठी प्रशंसेचा उद्गार ३५. पळून जाणे ३७. हिंदीत शाई ३९. भीतीने होणारा कंप ४१. च्याबद्दल ४३. तरतूद ४५. डोळे ४६. फटाक्यांची माळ ४७. हुक्की, लहर ४९. आणि ५०. वितरण, बटवडा ५१. टक, दृष्टी ५२. एक छोटे चर्मवाद्य ५४. खाल्लास शिष्टपणा, दिल्यास मूल्य ५५. अंदाज, तर्क ५७. हृदय ५८. औषध ६०. धातूचा धागा ६१. मूल ६२. स्तुती करण्याजोगे ६३. बाज विणण्याची कापडी पट्टी ६४. गणपती ६८. गाय ६९. मलीन, मळलेला ७१. पंकज ७४. पुष्पदल ७५. व्याप, अस्ताव्यस्त पडलेल्या वस्तू ७७. मध्यस्थ ७८. चर्चा ७९. नामघोष ८०. नृत्यकलेचे दैवत ८१. शिवशंकराच्या गौर वर्णाचे विशेषण

**उभे शब्द**

१. शिव्याशाप २. जबाबदार, करणारा ३. कोलकाताचे विमानतळ ४. पोपट ६. संपुष्टात येणे ७. होडी ८. विंचवाचा डसण्याचा अवयव ९. रम्य, मनोहर ११. गणिका १३. मार्गक्रमण १५. लुटारु, लबाड १८. सेवक, शिष्य २०. सारखा २१. अवस २२. गोष्टी सांगणे २४. मोगऱ्याची एक जात २५. चेष्टा, टिंगल २६. सारा, टॅक्स २८. आपला परका असा भेद ३०. विद्या ३१. प्रजा ३५. प्रतिष्ठा, सामाजिक वजन ३६. दृष्टीभेट ३८. स्वत:ला कमी लेखणे ४०. खोकला ४२. निरर्थक बडबड ४४. प्रचंड ४७. दोरीच्या गाठीचा एक प्रकार ४८. मेहरबानी ५३. चंदनाची वने असणारा पुराणकालीन पर्वत ५४. हमाल ५६. वेदना ५९. छोटे वादळ ६०. संगीतातील लकेर ६१. इकडून तिकडे गेले वारे अशी स्थिती! ६४. रडणे ६५. मृत्यदेवता ६६. ही देवता मूल जन्माला आल्यानंतर सहाव्या दिवशी त्याचे नशीब लिहून जाते असे म्हणतात ६७. चिखल ७०. मनाचा ओढा ७२. माकड ७३. विशेष ७४. पाप ७६. लाकडाची एक उत्कृष्ट जात ७८. मला

### शब्दकोडे-२५१ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.केसरी ३.मारा ६.करविर ७.खा खा ८.वर ९.राघवदास लाडू १०.सदन ११.डाकाईत १२.विरजण १४.साप १६.कसदार १८.लवाजमा २१.परतजाब २४.रमा २५.गारवा २७.दावेदार २८.दारू २९.परोपकार ३०.चलन ३२.नायनाट ३३.उपकार ३५.नित्यनेमाने ३८.घात ४०.यमक ४१.कविता ४४.लहानसहान ४७.लाज ४९.मळमळ ५१.लाडका ५२.कोयता ५५.कानवला ५८.मरमर ५९.बक ६१.घंटानाद ६२.रातबिरात ६४.आटा ६५.चहाफराळ ६६.झांज ६७.नरवर ६८.रमारमण

**उभे उत्तर**

१.केवडा २.सरकार ३.माघ ४.रावण ५.खसखस ६.कडू ६अ.विवर ७.खाद ७अ.खानसामा ९.रातसार १०.सणवार १३.जल १५.पत १६.कबर १७.रक्तदान १९.जमादार २०.कुलूप २१.परोपरीने २२.जागा २३.अंदाजपत्रक २६.वाचनालय ३१.लट ३४.अंतराळ ३५.निकाल लावणे ३६.मानस ३७.नकलाकार ३९.धनको ४२.विमला ४३.ताळ ४५.हाड ४६.नकारघंटा ४८.जन ५०.मकबरा ५३.यम ५४.तारणहार५६.वस्तरा ५७.सनातन ६०.कतरण ६३.बिगर ६४.आज ६५.चव ६५अ.रास

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

## न्यूज कॉलम

### रेल्वे अपघातात तरुण ठार

**दोंडाईचा ।** दोंडाईचा रेल्वे अपघातात तरुण ठार झाल्याची घटना २ डिसेंबरला सकाळी शिंदखेडा तालुक्यात घडली. दोंडाईचा ते शिंदखेडा रेल्वेगेटजवळील पट्ट्यावर (पोल क्रमांक १९२/ १४ व १९२/१६ दरम्यान) शनिवारी सकाळी सातच्या सुमारास विलास गंभीर पाटील (रा. रहिमपुरे ता. शिंदखेडा) याचा रेल्वे अपघातात मृत्यू झाला.

### बेपत्ता बालकांचा २४ तासांत घेतला शोध

**नाशिक ।** कौटुंबिक कारणांवरून तसेच घरातील पालक रागावल्याने घरातून निघून गेलेल्या दोघा विधी संघर्षित बालकांचा पंचवटी पोलिसांनी अवघ्या २४ तासांत शोध घेतला आहे. या बालकांना पुन्हा त्यांच्या पालकांच्या स्वाधीन करण्यात आले. फुलेनगर तेलंगवाडी येथील एक सोळा वर्षीय अल्पवयीन मुलगी तसेच मधुबन कॉलनी परिसरात राहणारा तेरा वर्षीय शाळकरी मुलगा शनिवारी कौटुंबिक कारणास्तव घरातून निघून गेला होता.

# क्रीडानगरी म्हणून नाशिकचा वाढणारा नावलौकिक अभिमानास्पद - मंत्री भुजबळ

### ६७ व्या राष्ट्रीय शालेय खो खो स्पर्धांचे शानदार उद्घाटन संपन्न

**नाशिक । प्रतिनिधी**





जिल्ह्यातील अनेक खेळाडूंनी विविध खेळ प्रकारांमध्ये केलेल्या उत्कृष्ट कामगिरीमुळे क्रीडानगरी म्हणून नाशिकचा नावलौकिक वाढत आहे ही अभिमानाची बाब असल्याचे प्रतिपादन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले.

मीनाताई ठाकरे विभागीय क्रीडा संकुल येथे ६७ व्या राष्ट्रीय शालेय खो खो स्पर्धेचे उद्घाटन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी जलज शर्मा, क्रीडा उपसंचालक रवींद्र नाईक, जिल्हा क्रीडा अधिकारी सुनंदा पाटील, स्कूल गेम फडरेशन ऑफ इंडियाचे निरीक्षक के. एस. मूर्ती, कनक चतूर्धर, अर्जुन पुरस्कार प्राप्त खेळाडू कविता राऊत यांच्यासह देशातील विविध राज्यांचे खो खो खेळाडू उपस्थित होते.

मंत्री छगन भुजबळ म्हणाले, नाशिकला लाभलेली नैसर्गिक संपन्नता व आरोग्यदायी वातावरण सर्वच प्रकारच्या खेळांसाठी पोषक आहे. त्यामुळे जिल्ह्यातील अनेक खेळाडूंनी याचा योग्य वापर करून जिल्ह्याचे नाव विविध खेळ प्रकारात जागतिक पातळीवर उंचावले आहे. यामध्ये अर्जुन पुरस्कार विजेत्या आंतरराष्ट्रीय खेळाडू कविता राऊत यांच्यासह विधीत गुजराती, दत्तू भोकनळ, अंजना ठमके, मोनिका अत्रे, संजीवनी जाधव, दुर्गा देवरे, किसन तडवी, ताई बामणे यासारख्या नामांकित खेळाडूंनी जिल्ह्याचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचवले आहे.

क्रीडा विश्वाला समृद्ध करणाऱ्या या खेळाडूंमुळेच नाशिकची ओळख आता क्रीडानगरी म्हणून नावारूपाला येत असल्याचे ही त्यांनी यावेळी सांगितले. गेल्या काही वर्षांत खेळाकडे बघण्याचा पालकांचा दृष्टिकोन बदलला आहे. त्यामुळेच पालक देखील अभ्यासासोबतच मुलांना खेळासाठी प्रोत्साहन देत असल्याने नवीन खेळाडूंचा विविध खेळ प्रकारात सहभाग वाढत आहे. तसेच शासनाच्या नव्या क्रीडा धोरणानुसार तालुका, जिल्हा व विभागीय क्रीडा संकुलासाठी देण्यात येणाऱ्या निधीत देखील दुपटीने वाढ करण्यात आली आहे. जेणेकरून खेळाडूंना खेळासाठी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध होतील आणि ते जिल्ह्याच्या नावसोबतच राज्याचे व देशाचे नाव उंचवतील. खेलो इंडिया आणि टॅलेंट हंट यासारख्या स्पर्धांचे शासनाकडून आयोजन करण्यात येत आहे. त्यातून चांगल्या खेळाडूंची निवड करून २०२८ ऑलिंपिकसाठी त्यांच्याकडून तयारी करून घेण्यात येत आहे. काल नाशिकचे खेळाडू टेबल टेनिस, वेटलिफ्टिंग, मैदानी खेळ, खो-खो, बॅडमिंटन, सायकलिंग, स्वीमिंग, तलवारबाजी, नौकानयन, कबड्डी, कुस्ती, व्हॉलीबॉल, क्रिकेट, शूटिंग, पॅरा थलेटिक्स, रोइंग, फुटबॉल, मल्लखांब, जिम्नॅस्टिक यांसारख्या अनेक खेळांत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करून आपले नैपुण्य सिद्ध करीत आहेत, असेही मंत्री छगन भुजबळ यांनी यावेळी सांगितले.

जिल्हाधिकारी जलज शर्मा म्हणाले, स्पर्धांच्या आयोजनामुळे खेळाडूंना प्रोत्साहन मिळत असते. खेळांमध्ये होणारी हार- जीत ही खेळाचाच एक भाग असते. खेळामुळे संघशक्ती वाढते. असे सांगून जिल्हाधिकारी शर्मा यांनी विविध राज्यांमधून आलेल्या खेळाडूंना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मंत्री भुजबळ यांच्या हस्ते क्रीडा ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर देशातील २८ राज्यांच्या खेळाडूंनी संचलन केले. मंत्री भुजबळ यांनी कार्यक्रम संपल्यावर सर्व उपस्थित खेळाडू व त्यांचे प्रशिक्षक यांना शुभेच्छा दिल्या. आजपासून सुरू झालेल्या या स्पर्धा ७ डिसेंबर पर्यंत सुरू असणार आहेत. यामध्ये देशातील २८ राज्यातील खेळाडूंनी सहभाग घेतला असल्याचे क्रीडा उपसंचालक रविंद्र नाईक यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले.

## ज्येष्ठ विधिज्ञ प्रेरणा देशपांडे यांच्या मुक्ताई या एकपात्री प्रयोगाला उत्तम प्रतिसाद

**नाशिक । प्रतिनिधी**



नाशिकच्या संत ज्ञानेश्वर मंदिर हुंडीवाला लेन येथे संजीवन समाधी सोहळा निमित्त ज्येष्ठ विधिज्ञ प्रेरणा देशपांडे यानी मुक्ताई हा एकपात्री प्रयोग सादर केला. त्याला रसिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला. पांडुरंग शौचे व नीलेश शौचे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

सर्व रसिक हा मंत्रमुग्ध होऊन ऐकत होते. एकेक प्रसंगाचे वर्णन हुबेहुब, साजेसा मेकअप, प्रत्यक्ष मुक्ताई बोलतेय असा भास होत होता. मुक्ताईच्या जीवनातील सर्व प्रसंग अभिनित होताना सर्वांच्या डोळ्यात पाणी तरळत होते. प्रेक्षक सगळे भावुक झाले होते. अतिशय अभ्यास पूर्ण लेखन, उत्कृष्ट नाट्य अभिनय आणि वरुण भोईर यांचे साजेसे संगीत संयोजन यामुळेच कार्यक्रम एका उंचीवर गेला. प्रेक्षकांना खिळवून ठेवण्यात प्रेरणा देशपांडे यशस्वी झाल्या. देशपांडे यांचे नाट्य अभिनय वाखाणण्यासारखे होते.

## सोनगडे याची राज्यस्तर बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड

**शिरपूर ।** आर.सी.पटेल मराठी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी मोहित सोनगडे याची राज्यस्तर बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नंदुरबार व जिल्हा बॉक्सिग संघटना नंदुरबार यांच्या संयुक्त विद्यमाने विभागस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.


## जाहीर नोटीस

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार धुळे ग्रामीण यांचे न्यायलयात**

श्री. संगिता बाळू पाटील, उ.व.४६ व्यवसाय- घरकाम,
पत्ता :- मु.पो. जिराली ता.परोळा जि.जळगांव ... **अर्जदार**

**॥ विरुध्द ॥**

ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय दापुरी ता.जि.धुळे ...**जाबदेणार**

श्री. संगिता बाळू पाटील रा.जिराली ता. पारोळा जि. जळगांव यांनी इकडील कार्यालयास अर्ज करून त्यांची आई कै. कलाबाई चैत्राम पाटील रा. दापुरा -दापुरी ता. जि. धुळे यांचा मृत्यु दि३०/०४/१९८२ रोजी दापुरा - दापुरी ता. जि. धुळे येथे मृत्यु झाला आहे. तरी महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंद अधिनियम १९६९ चे कलम १३ पोट कलम ३ अन्वये मृत्यु नोंद होणे व तसे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी सदर अर्जास कोणाची काही एक हरकत असल्यास अथवा खुलास दयावयाचा / मांडावयाचा असल्यास त्यांनी दि. ०४/०१/२०२४ रोजी ठिक सकाळी ११.०० वा स्वतः अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकत सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकत नसलयाचे गृहीत धरून सदर अर्जाबाबत पुढिल कारवाई करण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस धुळे येथिल मा.कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार धुळे ग्रामीण यांचे सही शिक्यानिशी दि. ०४/१२/२०२३ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ :- धुळे
दिनांक :- ०४/१२/२०२३

शिक्का

**(संजय पवार)**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार धुळे ग्रामीण**


## माळी समाज वधु वर मेळावा उत्साहात संपन्न

**नाशिक । प्रतिनिधी**



सत्यशोधक माळी समाज सेवाभावी संस्था वधू वर सूचक मंडळ नाशिक यांच्या वतीने माळी समाजाचा वधू वर परिचय मेळावा संपन्न झाला. मेळावा संपूर्णपणे विनामूल्य होता. यासाठी राज्यभरातील वधू - वर व पालक मोठया संख्येने उपस्थित होते.

यावेळी प्रमुख पाहुणे प्रा. दिनकरराव जानमाळी, माजी उपमहापौर प्रथमेश गीते, वैभव बडदे, तेजश्री काठे, शेफाली भुजबळ, नीलिमा सोनवणे, कुसुमताई शिंदे, वसंतदादा वझरे, ज्ञानेश्वर पवार, सुनील थळकर, संदीप जगताप, संतोष कमोद उपस्थित होते. याप्रसंगी संपूर्ण महाराष्ट्रातून एक हजारपेक्षा जास्त वधू-वरांनी नोंदणी करून परिचय करून दिला. ह्या मेळाव्यात अनेक वधूंनी आपल्याला नोकरीवाला व सरकारी नोकरी असलेला वर पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली.

शशी हिरवे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, सामुदायिक विवाह ही एक काळाची गरज आहे, तरी समाज बांधवांनी सामुदायिक विवाहसाठी पुढे यावे. हिरवे यांच्या हस्ते दीप प्रज्वल करून व व फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मेळाव्यास सुरुवात झाली. सूत्रसंचालन संजय भोसले व नितीन जाधव यांनी केले. मेळावा यशस्वी करण्याकरता संस्थेचे गिरीश बच्छाव, रमेश गायकवाड, शंतनु शिंदे, संजय भडके, किशोर भास्कर, दौलतराव शेलार, भास्करराव गांगुर्डे, संतोष घोडे, भरत क्षीरसागर, प्रकाश बेळे, विजय शेळके, अनिल काठे, शंकरराव काठे, सुमित पुंड, अनिल गायकवाड, संजय हिरवे, सचिन गायकवाड, संपत क्षीरसागर, रामदास घोडेकर, निशांत बच्छाव, शेखर भुजबाळ, भरत क्षीरसागर, विनायक पवार, संजय निकम, भारतीताई शेलार, वनिता थळकर आदींनी प्रयत्न केले. उपस्थितचे आभार संस्थेचे शंतनु शिंदे यांनी मानले.

## शहरात लवकरच दिव्यांग भवन बांधण्यात येणार- सावजी

### दिव्यांग बांधवांना समाजरत्न पुरस्कार प्रदान

**सिडको । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी दिव्यांग विकास आघाडीच्या वतीने रविवारी जागतिक दिव्यांग दिनानिमित्त सर्व क्षेत्रातील दिव्यांग बांधवांचा समाजरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

यावेळी भाजपा शहर अध्यक्ष प्रशांत जाधव, जेष्ठ नेते लक्ष्मण सावजी, महिला मोर्चाच्या प्रदेश महामंत्री छाया देवांग, जिल्हा अध्यक्ष सुनील बच्छाव, सरचिटणीस नाना शिलेदार, महिला मोर्चाच्या शहर अध्यक्षा सोनाली ठाकरे, न्यू विकलांग बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा यमुना घुगे, दिव्यांग आघाडीचे जिल्हा अध्यक्ष गोटीराम सूर्यवंशी, माधवराव वाघ, शहर अध्यक्ष विनायक कस्तुरे, क्रांती सेनेचे अध्यक्ष रंगनाथ दरगुडे यांच्यासह दिव्यांग बांधव उपस्थित होते. दिव्यांग आघाडीच्या वतीने सर्व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. लक्ष्मण सावजी यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हटले की, काही दिवसांत महापालिका आयुक्त यांची भेट घेऊन दिव्यांग भवन बांधण्यात येईल. यावेळी छाया देवांग यांनी आपले विचार मांडले.

शासकीय अधिकारी विलास दंडगव्हाळ, शासकीय कर्मचारी नंदु जाधव वारकरी, पंढरीनाथ उगले, जयश्री टोचे, खेळाडू गणेश कस्तुरे, खेळाडू बबलु मिर्झा, दिव्यांग समाज सेवेच्या यमुना घुगे आदी मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी प्रास्ताविक बाळासाहेब घुगे यांनी केले. तर आभार विनायक कस्तुरे यांनी मानले.


अ‍ॅड. तुकाराम एन. मासुळे, धुळे
नि.६

## जाहीर नोटीस

**शिंदखेडा येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. क.स्तर यांचे कोर्टात**

**दि.कि. अर्ज क्रं.२८३/२०२३**

१) करुणा सुनिल कढरे वगैरे ३ २) पद्मजा सुनिल कढरे
३) मानसी सुनिल कढरे ४)श्रीमती शकुंतला सदाशिव कढरे ... **अर्जदार**

**॥ विरुध्द ॥**

कै.सुनिल सदाशिव कढरे (मयत) ...**जाबदेणार**

मुंबई रेग्युलेशन १८२७ अ‍ॅक्ट (भाग VIII) प्रमाणे वारस दाखला मिळण्यासाठी.

या जाहिर नोटीसीव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, मयताचे कायदेशीर वारस म्हणून अर्जदार यांनी सदरचा अर्ज केला आहे. मयत कै. सुनिल सदाशिव कढरे हे मौजे नरडाणा, ता. शिंदखेडा, जि. धुळे येथे दि. २१/३/२०२० रोजी मयत झाले आहेत. त्यांच्या वारसांनी कायदेशीर वारस म्हणून शिंदखेडा येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. क. स्तर यांचे कोर्टात वारस दाखला मिळणेसाठी मुंबई रेग्युलेशन अ‍ॅक्ट १८२७ भाग VIII प्रमाणे अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाचे कामी दि.२१/१२/२०२३ रोजी पुढील कार्यवाहीसाठी तारीख नेमण्यात आलेली आहे. सदर वारस दाखला बाबत कोणाचीही हरकत/म्हणणे असल्यास अगर अधिकार असल्यास त्यांनी चौकशीच्या दिवशी सकाळी १०.३० वाजता स्वतः अथवा वकिलामार्फत शिंदखेडा येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. क. स्तर यांचे कोर्टात हजर होवून लेखी हरकत घ्यावी.

सदर दिवशी चौकशीचे कामी कोणाचीही काहीही हरकत न आल्यास चौकशीचे कामकाज पुर्ण होवून अर्जाचा निकाल दिला जाईल. कळावे,

आज दि. १२/१०/२०२३ रोजी आमच्या सही निशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिला आहे.

शिंदखेडा
दि.१२/१०/२०२३

शिक्का

आदेशावरुन

**कामगिरी कारकुन**
**मे. दिवाणी न्यायाधीश सो. क. स्तर, शिंदखेडा**

**सहा. अधिक्षक**
**मे. दिवाणी न्यायाधीश सो. क. स्तर, शिंदखेडा**


## चांदशी ज्येष्ठ नागरिक सन्मित्र मंडळाच्या अध्यक्षपदी विजय बिरारी



**नाशिक ।** चांदशी ता. नाशिक येथील ज्येष्ठ नागरिक सन्मित्र मंडळाच्या अध्यक्षपदी एलआयसीचे सेवानिवृत्त अधिकारी विजय बिरारी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यानंतर त्यांच्यावर अभिनंदनचा एकच वर्षाव झाला.

मंडळाचे मावळते अध्यक्ष दत्तू सोनवणे यांनी वैयक्तिक कारणास्तव आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने ही निवडणूक घेण्यात आली. अध्यक्षस्थानी भोसलाचे सेवानिवृत्त क्रीडा शिक्षक मोहन चंगेडे होते. बैठकीस ज्योत्स्ना जाधव, भगीरथ मंडलिक, माधवराव पाटील, बी.बी.मोरे, संभाजी शेवाळे, रमेश आहेर, किशोर देशमुख, एकनाथ शिरसाट, प्रियदर्शन टांकसाळे, बाळासाहेब सोनवणे, बाळासाहेब चालसे, अरुण कोरडे, प्रमोद चिकेरूर आदी उपस्थित होते.

## गोदावरी परिक्रमेला देशभरातून आलेल्या साधुसंतांचा उस्फूर्त प्रतिसाद

**नाशिक । प्रतिनिधी**



**या विश्व कल्याणार्थ गोदावरी परिक्रमेच्या माध्यमातून गोदावरी नदी निर्मल, अविरल, प्रदुषणमुक्त वाहत रहावी यासाठी संत महंत व समाज यांच्या माध्यमातून पर्यावरण पुरक व्हावी यासाठी सहभाग घेण्यात आला.**
**- निशिकांत पगारे,** अध्यक्ष गोदावरी नदी संवर्धन समिती, नाशिक.

गोदावरी ही गंगेची मोठी बहिण असून हिंदु धर्मामध्ये गंगेइतकेच महत्त्व असलेल्या गोदावरीची परिक्रमा ही गेल्या अनेक वर्षांपासून बंद पडलेली होती. ही परिक्रमा पूर्ववत होत असून यानिमित्ताने गोदावरीचे महत्त्व सर्वापर्यंत पोहचविणे आणि गोदावरी स्वच्छ ठेवून तीचे संवर्धन करण्याच्या आणि विशेष म्हणजे विश्वकल्याणार्थ गोदावरी उगम ते संगम गोदावरी परिक्रमेचे आयोजन करण्यात आल्याचे मंगलपिठाधिश्वर श्री महंत १००८महामंडलेश्वर माधवाचार्य महाराज यांनी सांगितले.

अखिल भारतीय विरक्त साधु समाज मंडळ नाशिक यांच्यावतीने गोदावरी नदी उगम ते संगम अर्थात ब्रम्हगिरी ते राजमहेंद्री या दरम्यान गोदावरी परिक्रमेचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी सकाळी सर्व भारतभरातून आलेल्या सर्व साधु संत महंताच्या उपस्थित तसेच पंचमुखी हनुमान मंदिराचे महंत श्री भक्तीचरणदास महाराज आणि महंत श्री माधवाचार्य महाराज यांच्या हस्ते त्रंबकेश्वर येथील कुशावर्तावर जलपुजन करुन गोदावरी परिक्रमेचा संकल्प करुन गोदावरी परिक्रमेला प्रारंभ झाला. यानंतर या गोदावरी परिक्रमेचे गिरणारे गावातील बालाजी धाम मंदिरात ग्रामस्थांनी जेसीबीद्वारे पुष्पवृष्टी करत भव्य दिव्य असे स्वागत केले. त्यानंतर परिक्रमा नाशिकला आल्यानंतर पंचमुखी हनुमान मंदिरातही जलपुजन करुन गोदावरी परिक्रमा पुढील प्रवासाकडे रवाना झाली. यावेळी महंत अनिकेत शास्त्री, त्रंबकेश्वर येथील देवबाप्पा आश्रमाचे महंत रघुनाथ महाराज फरशीवाले महाराज, महंत परमात्मादास महाराज, महंत केशवदास महाराज, महंत लालदास महाराज, बालकदास त्यागी महाराज, गोदान नदी संवर्धन समितीचे अध्यक्ष निशिकांत पगारे, भाई सोनार, योगेश बर्वे, राहुल बर्वे, नरहरी उगले आदींसह साधु संत महंत उपस्थित होते.

## बदली कामगारांचे एचएएलमध्ये जोरदार स्वागत

**नाशिक । प्रतिनिधी**




जिल्ह्यात एचएएल नाशिक विभागातून दिड वर्षापूर्वी बंगलोर येथील तूमकुरू येथे बदली झालेल्या १२ कामगारांची परत त्यांच्या नाशिक येथील मुळ विभागात बदली झाल्याने सदर कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान नाशिक विभागातून हे १२ कामगार दिड वर्षापूर्वी नव्यानेच स्थापन झालेल्या तुमकुरू येथील कंपनीत बदली झाले होते. बदली झाल्यामुळे सदर कामगारांना त्या ठिकाणी अनेक आव्हानांचा सामना करावा लागत होता. राहण्याची सोय, तेथील खान-पाण्याची प्रथा यांची सांगड बसत नव्हती तसेच मुलांच्या शिक्षणाचा प्रश्नही निर्माण झाला होता. अशा वेळी कामगार संघटनेचे सरचिटणीस संजय कुटे आणि अध्यक्ष अनिल मंडलिक यांनी वेळोवेळी स्थानिक व्यवस्थापन आणि बंगलोर येथील उच्च व्यवस्थापन यांच्याकडे पाठपुरावा करून या कामगारांना नाशिक येथे आणण्याची आग्रही मागणी केली होती.

कामगार संघटनेची मागणी लक्षात घेत उच्च व्यवस्थापनाने तुमकुरु येथे बदली झालेल्या कामगारांना परत नाशिक विभागात पाठविण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. यापूर्वीही तीन दिव्यांग कामगारांच्या अन्यायकारक झालेल्या बदल्या कामगार संघटनेने त्वरित मागे घेण्यास उच्च व्यवस्थापनास भाग पाडले होते. तसेच चार महिन्यांपूर्वी सुद्धा पाच कामगार बांधवांना मामुन, कानपूर आणि तूमकुरु येथून परत नाशिक विभागात आणण्यास कामगार संघटनेला यश आले आहे. त्यामुळे सर्व तीन हजार कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

दरम्यान बदली झालेल्या सर्वच कामगारांना लवकरात-लवकर नाशिक विभागात परत आणले जाईल असा विश्र्वास कामगार संघटनेचे सरचिटणीस संजय कुटे आणि अध्यक्ष अनिल मंडलिक यांनी व्यक्त केला आहे. कामगार संघटनेची मागणी लक्षात घेत उच्च व्यवस्थापनाने तुमकुरु येथे बदली झालेल्या कामगारांना परत नाशिक विभागात पाठविण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.

## तरुणींचा १०० गावांत बालविवाहविरोधी जागर

**नाशिक ।** उत्तर महाराष्ट्रासह राज्यभरात बालविवाहाचा प्रश्र्न दिवसेंदिवस गंभीर बनला असून कायद्यात कठोर तरतूदी करूनही बालविवाहाच्या घटना समोर येत आहेत. गेल्याच महिन्यात नाशिक जिल्ह्यात आठ प्रकरणे समोर आली आहेत. या पाश्र्वभूमीवर मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या समाजकार्य महाविद्यालयाच्या वतीने शहरासह जिल्ह्यात बालविवाह मुक्त भारत अभियान राबविण्यात येत आहे. या अभियाना अंतर्गत १०० हून अधिक गावात विद्यार्थ्यांसह स्थानिक महिलांना सोबत घेऊन रॅली काढून बालविवाह निर्मूलनाबाबत जनजागृती करीत ग्रामस्थांना बालविवाहविरोधी शपथ देण्यात आली.


अ‍ॅड. जी. एन. गढरी
नि.६

## जाहीर नोटीस

**साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश (कनिष्ठ स्तर) सो. यांचे न्यायालयात**

**दि.कि.अ.नं.२२२/२०२३**

१) हुसेनाबी हनीफ खाटीक २) तौसीफ हनीफ खाटीक
३) तवरेज हनीफ खाटीक ४) यास्मीनवी हनीफ खाटीक
सर्व रा. स्वामी विवेकानंद चौक खाली ता.साक्री जि.धुळे, ... **अर्जदार**

**॥ विरुध्द ॥**

१) हनीफ इरमाईल खाटीक २) इस्माईल शालक खाटीक
३) आमीनाबी इस्माईल खाटीक ...**मयत**
**कोणीही नाही** .... **सामनेवाले**

बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट कलम ८ अन्वये ज्याअर्थी अर्जदार याने साक्री येथील मा.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर सो. यांचे न्यायालयात दिनांक १४/०७/२०२३ रोजी दिवाणी किरकोळ अर्ज नं. २२२/२०२३ चा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन कायदा कलम ८ (III) प्रमाणे वरील अर्जदार यांनी वारस दाखला मिळणेकामी अर्ज दाखल केलेला आहे.

ज्याअर्थ मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौकशी दिनांक २९/०९/२०२३ ही दिलेली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, अर्जदार नं. १ ते ४ हे मयत नं. १ यांचे कायदेशीर वारस आहेत. याबाबत काही म्हणणे, वाद असल्यास त्याबाबत मे. न्यायालयात उक्त निश्चीत तारखेस वा तत्पुर्वी उपस्थीत राहुन हरकत नोंदवावी. त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेली व निश्चीत केलेल्या तारखेपर्यन्त कोणाचीची काहीएक हरकत आली नाहीतर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल. त्यानंतर येणा- या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

धुळे, दिनांक १७/७/२०२३

शिक्का

**कामगिरी कारकुन**
**दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) साक्री.**

**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) साक्री.**

## न्यूज कॉलम

### घरातून भरदिवसा दागिने लांबविले

**धुळे ।** मोहाडी उपनगर येथील शिवानंद कॉलनीत चोरट्यांनी भरदिवसा चोरी केली. घरातून चोरट्यांनी १३ हजार ५०० रुपयांचे कानातले दागिने, १२ हजारांची सोनपोत, १२ हजारांचे मणी व दीड हजाराची सोनफुली असा एकूण ३९ हजारांचा ऐवज लंपास केला. चोरीची ही घटना सकाळी आठ ते दुपारी साडेतीनदरम्यान घडली. याबाबत मुकेश चिंतामण सूर्यवंशी (रा. २७, शिवानंद कॉलनी, मोहाडी) यांच्या तक्रारीवरून नोंद झाली.

### शहरामध्ये पाऊस ५ डिसेंबरपर्यंत शक्य

धुळे । नाशिक ग्रामीण पोलिसांकडून गुटखा विरोधी अभियान महिनाभरापासून सुरू असून आतापर्यंत ५५६ ठिकाणी छापे टाकून दोन कोटी, १० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ग्रामीण पोलिसांकडून जिल्ह्यातील गुटखा विक्रीला पायबंद घालण्यासाठी यापूर्वी चार वेळा अभियान राबविण्यात आले आहे. नोव्हेंबरपासून नव्याने अभियानाला सुरुवात करण्यात आली. या कारवाईत दोन संशयितांना अटक करून सुमारे ७० लाख ८,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. महिनाभरात ५५६ गुन्हे दाखल करुन ७५४ संशयितांना अटक करण्यात आली आहे.

# सातपायरी धरणात पाणी टाकण्यासाठी सर्व्हे अहवाल तत्काळ सादर करावा

### आ.कुणाल पाटील यांच्या सूचना

**धुळे । प्रतिनिधी**



अक्कलपाडा प्रकल्पातून धुळे तालुक्यातील बुरझड परिसरातील सातपायरी धरणात पाणी टाकण्यासाठी सर्व्हेक्षण करुन त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकार्यांना त्वरीत सादर करण्याच्या सूचना आ.कुणाल पाटील यांनी पाटबंधारे मध्यम प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता पी.जी.पाटील यांना दिल्या. तर मंत्रालयीन पातळीवर अक्कलपाडा प्रकल्पातून सातपायरी धरणात पाणी टाकण्यासाठी प्रयत्न केले जातील अशी माहिती आ.पाटील यांनी जलसंघर्ष समिती बुरझड परिसरच्या पदाधिकार्यांना तसेच ग्रामपंचायत पदाधिकार्यांना दिली. दरम्यान सातपायरी लघु प्रकल्पासाठी ५ टक्के पिण्याचे पाणी राखीव करण्याचीही मागणी यावेळी जलसंघर्ष समितीने केली.

धुळे तालुक्यासह जिल्हयात दुष्काळ आहे.परिणामी धुळे तालुक्यातील बुरझड येथील सातपायरी लघु प्रकल्प कोरडाठाक झाला आहे. म्हणून सिंचनासह पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे. सातपायरी धरणात अक्कलपाडा प्रकल्पाचे पाणी डाव्या कालव्यातून मौजे निमडाळे जवळून सातपायरी धरणापर्यंत पाटचारी तयार करुन सदर धरण भरण्यात यावे अशी मागणी बुरझड, नंदाणे, वडणे, सायने येथील शेतकरी व ग्रामस्थांकडून होत आहे.त्याअनुषंगाने जलसंघर्ष समिती बुरझड परिसर आणि या गावातील ग्रामपंचायत पदाधिकारी, शेतकर्यांनी आ.कुणाल पाटील यांची भेट घेतली.यावेळी समितीच्यावतीने आ.कुणाल पाटील यांना निवेदन देण्यात आले. अक्कलपाडा प्रकल्पाच्या डाव्या कालव्यातून सातपायरी धरण भरण्यात यावे तसेच या लघु प्रकल्पासाठी ५ टक्के पाणी आरक्षित करण्यात यावे अशी मागणी जलसंघर्ष समितीने निवेदनातून केली.

याप्रसंगी आ.कुणाल पाटील यांनी पाटबंधारे मध्यम प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता पी.जी. पाटील यांच्याशी भ्रमणध्वनीने संपर्क साधून दुष्काळ,पिण्याच्या पाण्याची टंचाई लक्षात घेऊन सातपायरी धरण भरण्यासाठी आवश्यक असलेले सर्व्हे क्षण ताबडतोब करावा, आणि सदरचा सर्व्हे अहवाल तत्काळ जिल्हाधिकार्यांना सादर करावा अशा सूचना दिल्या. दरम्यान अक्कलपाडा प्रकल्पातून सातपायरी धरणात पाणी टाकण्यासाठी व पिण्याचे पाणी राखीव करण्यासाठी मंत्रालयीन पातळीवर शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचेही आ.पाटील यांनी जलसंघर्ष समितीच्या पदाधिकार्यांना सांगितले. याप्रसंगी जलसंघर्ष समितीचे अध्यक्ष मच्छिंद्र पाटील, सचिव ज्ञानेश्वर पाटील, बाजार समितीचे उपसभापती योगेश पाटील, नंदाणे माजी सरपंच माधवराव पाटील, बाजार समितीचे संचालक एन.डी. पाटील, बुरझड सरपंच संतोष पाटील, संदिप मगन पाटील, नंदाणे सरपंच रविंद्र पाटील, नितीन शंकर पाटील, हिरामण पाटील, अतुल शिरसाठ, रामचंद्र पाटील, बारकु पाटील, समाधान पाटील, साहेबराव पाटील, महेंद्र पाटील,नाना माळी,सुभाष माळी, रोहिदास पाटील, बापू पाटील, अनिल पाटील, रामकृष्ण पाटील, महेंद्र महाले, अशोक नागमल, भरत पाटील आदी उपस्थित होते.

# बोरसुले येथे विकसित भारत संकल्प यात्रा संपन्न




### लाभार्थ्यांना विविध लाभाचे झाले वाटप

**धुळे । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून विकसित भारत संकल्प यात्रेचे देशभरात आयोजन करण्यात येत आहे. या पार्श्र्वभूमीवर विकसित भारत संकल्प यात्रा धुळे तालुक्यातील ग्रामपंचायत,बोरसुले येथे उत्साहात संपन्न झाली.

बोरसुले येथील विकसित भारत संकल्प यात्रा कार्यक्रमाला सरपंच श्रीमती. शितल पाटील , उपसरपंच श्रीमती.ऊजनबाई गिरासे,नायब तहसीलदार तथा पुरवठा अधिकारी मायानंद भामरे , संपर्क अधिकारी दिपाली देसले, ग्रामसेवक श्रीमती साधना झालसे ,वैद्यकीय अधिकारी भूषण भदाने,एम. पी. डब्ल्यू कैलास मराठे, ए.एन.एम. वैभवी मोरे ,तालुकास्तरीय बचत गट श्रीमती ज्योती पगारे , तसेच अंगणवाडी कार्यकर्ती, मदतनीस, आशा वर्कर, बचत गट अध्यक्ष इतर सदस्य व गावातील इतर ग्रामपंचायत सदस्य तसेच इतर नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

केंद्र सरकारच्या प्रमुख योजनांचा लाभ लक्षीत घटकापर्यंत वेळेत पोहचावा यासाठी केंद्र सरकारकडून विकसित संकल्प यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र असलेले मात्र अद्याप ज्यांना लाभ मिळू न शकलेल्या पात्रताधारक व्यक्तिंना केंद्र शासनाच्या महत्वाकांक्षी योजनांची माहिती या एलईडी व्हॅनमार्फत देण्यात येत आहे. आहे. तसेच पात्र लाभार्थ्यांकडून विविध योजनांचे अर्ज भरुन घेण्यात येत आहे.

दुसाने येथे झालेल्या कार्यक्रमात मान्यवराच्या उपस्थित लाभार्थ्यांना लाभाचे वाटप करण्यात आले. यावेळी शेतकऱ्यांना ड्रोनद्वारे फवारणी कशी करावी याचे प्रात्यक्षिकही दाखविण्यात आले. यावेळी ग्रामस्थ व लाभार्थी तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# देवरे अभियांत्रिकी च्या धर्मेश चावडा चा सोलर वर्ल्ड काँग्रेस मध्ये सहभाग

**धुळे । प्रतिनिधी**



श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या बापूसाहेब शिवाजी राव देवरे अभियांत्रिकी महाविद्यालयातील बी टेक मेकॅनिकल चा विद्यार्थी धर्मेश जिग्नेश चावडा याने नवी दिल्ली येथील हॉटेल अशोका मध्ये नुकत्याच झालेल्या सोलर वर्ल्ड काँग्रेस २०२३ मध्ये परफॉर्मन्स ॲनॅलिसीस ऑफ वेस्ट टू बेस्ट सोलर वॉटर हिटर या विषयावर शोध निबंध ( रिसर्च पेपर ) व या विषयावरील पोस्टर सादर केले. त्याला मेकॅनिकल विभाग प्रमुख व सहलेखक प्रा डॉ संजीव सूर्यवंशी यांचे महत्वपूर्ण मार्गदर्शन लाभले.

इंटरनॅशनल सोलर एनर्जी सोसायटी व सोलर एनर्जी सोसायटी ऑफ इंडिया यांनी संयुक्तपणे या पाच दिवसांच्या सोलर वर्ल्ड काँग्रेस २०२३ चे आयोजन केले होते, त्यात धर्मेश चावडा महाराष्ट्र राज्यातून एकटा सहभागी झाला होता. त्याच्या या उल्लेखनीय यशा बद्दल श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष मा आ कुणाल पाटील, महाविद्यालयाचे अध्यक्ष सुभाष देवरे, प्राचार्य प्रा डॉ हितेंद्र पाटील यांनी महाविद्यालयाच्या वतीने त्याचे अभिनंदन केले व भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. धर्मेश चावडा चा महाविद्यालयात व्यवस्थापन प्रतिनिधी व उद्योजक श्री विलास देवरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला या प्रसंगी प्राचार्य डॉ हितेंद्र पाटील व मेकॅनिकल विभाग प्रमुख प्रा डॉ संजीव सूर्यवंशी उपस्थित होते.

### वातावरण बदलाने दवाखाने फुल्ल

धुळे । गेल्या आठवड्यात अवकाळी पाऊस झाल्याने अचानक वातावरणात बदल झाला आहे. यामुळे नागरिकांचे आरोग्य बिघडले आहे. परिणामी दवाखाने फुल्ल झाले आहेत. जिल्ह्यात गेल्या आठवड्यात तीन ते चार दिवस अवकाळी पावसाने हजेरी लावली. यामुळे वातावरणात कमालीचा गारवा निर्माण झाला आहे. अचानक झालेल्या वातावरण बदलाने नागरिकांचे आरोग्य बिघडले आहे. शिवाय दिवसभर असणाऱ्या धुक्यामुळे देखील नागरिकांचे आरोग्य बिघडत आहे. यामुळे दवाखान्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर रुग्णांची गर्दी वाढली आहे. सर्दी, खोकला, ताप, अंगदुखी आदी त्रास रुग्णांना जाणवत आहे.

# महात्मा जोतीराव फुले हे दूरदृष्टीकोन असलेले शैक्षणिक तत्त्वचिंतक आणि समाज सुधारक होते :व्ही. टी. गवळे

**धुळे । प्रतिनिधी**




येथील जयहिंद हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, धुळे येथे महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुण्यतिथी निमित्ताने अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. महात्मा जोतीराव फुले यांच्या प्रतिमेचे पूजन विचारमंचावर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य एस. व्ही. बैसाणे, पर्यवेक्षक एस. डी. मोरे, व्ही. टी. गवळे, पर्यवेक्षिका सौ. एम. व्ही. पिंपळीसकर, जेष्ठ शिक्षक एस. डी. पाटील विचारमंचावर उपस्थित होते. विद्यालयाच्या पर्यवेक्षिका सौ. मीना पिंपळीसकर यांनी महात्मा ज्योतिराव फुले यांचा जीवन प्रवास, सामाजिक व शैक्षणिक कार्य यावर प्रकाश टाकला. तर व्ही. टी. गवळे यानी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून सांगितले की, महात्मा ज्योतिराव फुले हे दूरदृष्टीकोन असलेले शैक्षणिक तत्त्वज्ञ आणि समाज सुधारक होते. महात्मा ज्योतिराव फुले यांना शंभर वर्ष आधी भविष्याचा वेध कळत असे. म्हणून त्यांनी शैक्षणिक सुधारणा आणि सामाजिक सुधारणा यावर महत्वपूर्ण भर दिला. स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करणारे फुले दांपत्य खरोखर जगातील एकमेव आदर्श उदाहरण आहे. भारतीय नागरिकांवर फुले दांपत्याचे न फिटणारे उपकार आहेत, असे सांगितले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महात्मा फुले यांचे जीवीत कार्य वाचून त्यांना गुरु मानले. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जगात विद्वान म्हणून ओळख झाली. तसेच विद्यार्थ्यांनी सुद्धा आपल्या आयुष्यात चांगला आदर्श विचारप्रवाह आपल्या गुरुस्थानी ठेवावा जेणेकरून आपण डोळस श्रद्धा असलेले भावी समाजप्रिय नागरिक बनू या, असे गवळे म्हणाले. कार्यक्रमाचे संयोजन तथा प्रास्ताविक सौ. व्ही. एन. सूर्यवंशी यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी भावना शिंदे, सुनिता साळुंखे, वंदना पाटील, स्मिता पाटील, टी. एच. पाटील, संजीव पावरा, अविनाश तावडे, जे. आर. वाघ आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास विद्यार्थी व शिक्षक बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजपाच्या तीन राज्यात महाविजयाचा साक्री येथे विजय उत्सव जल्लोष



**साक्री ।** देशात झालेल्या राजस्थान, मध्य प्रदेश व छत्तीसगड या तीन राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत पुन्हा या देशाच्या जनतेने देशाचे लाडके पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर विश्र्वास दाखवत भाजपने विजय प्राप्त केला पुन्हा मोदी हे तो मुनकीने या घोषणा देऊन साक्री तालुका व शहर भाजपच्या वतीने साक्री विजय जल्लोष साजरा केला.

याप्रसंगी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष चंद्रजीत पाटील, तालुकाध्यक्ष संजय अहिरराव, जिल्हा सरचिटणीस शैलेश आजगे, जि प सदस्य गोकुळसिंग परदेशी, तालुका उपाध्यक्ष राकेश दहिते, तालुका सरचिटणीस सुरेश शेवाळे, शहराध्यक्ष राकेश अहिरराव, शहराचे उपाध्यक्ष योगेश चौधरी, नाशिक विभाग संयोजक योगेश भामरे, मुकुंद बोरसे, हेमंत पवार ,अनिल पवार, रोहित पवार, विश्र्वासराव पवार, राजेंद्र शर्मा, जगदिश चाळसे, निखिल गौड, सुभाष निकम ,सुनील देशमुख, उज्वल भोसले, सुनील चव्हाण,युवा कार्यकर्ते उत्कर्ष चौधरी आदींसह भाजपचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# एड्स दिनानिमित्त जनजागृतीपर रॅली

**शिरपूर । प्रतिनिधी**



एच. आर. पटेल फार्मसीत एड्स दिनानिमित्त जनजागृतीपर रॅली काढण्यात आली.

जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथक, उपजिल्हा रुग्णालय शिरपूर आणि एच. आर. पटेल. औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय शिरपूरच्या राष्ट्रीय सेवा योजना, आय.क्यु.ए.सी. सेल आणि औषधी रसायनशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने १ डिसेंबर रोजी एड्स दिनानिमित्त जनजागृतीपर रॅली काढण्यात आली. महाविद्यालयीन युवांमध्ये एड्स विषयी जनजागृती निर्माण व्हावी तसेच एचआयव्ही/ एड्सबद्दल समाजांना शिक्षित करण्याबाबत एड्स जागरूकता वाढली पाहिजे या प्राथमिक उद्दिष्टसह इतर संबंधित माहितीचे वितरण व्हावे या प्रमुख उद्देशाने रॅलीचे आणि पथनाट्याचे आयोजन करण्यात आले.

सदर रॅलीचे उद्घाटन आर. सी. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालायाचे प्राचार्य डॉ. डी. आर. पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. बारी, आर. सी. पटेल फार्मसी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. ए. ए. शिरखेडकर, आय.सी.टी.सी. उपजिल्हा रुग्णालय शिरपूर येथील गोपाल वानखेडकर (समुपदेशक), नानाभाऊ बडगुजर (समुपदेशक), सतीश माळी (प्रयोगशाळा तंत्रज्ञ) यांनी हिरवा झेंडा दाखवून केले. या वेळी एन.जी.ओ. चे प्रतिनिधी मनोज भोईर व वर्षा अहिरे उपस्थित होते. सदर रॅली महाविद्यालय, करवंद नाका, आशीर्वाद हॉस्पिटल परत करवंद नाका ते महाविद्यालय या मार्गे काढण्यात आली. रॅलीत विद्यार्थ्यांनी वचन पाळा, एड्स टाळा, आरोग्याचा अधिकार असा नारा दिला. याप्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पथनाट्य देखील सादर केले. या पथनाट्याद्वारे सर्वसामान्य लोकांमध्ये एड्स विषयी जागृती निर्माण करण्यात आली. या पथनाट्यात चिंतन पाटील, अदिती शिंदे, साक्षी भारती, अनुजा येवते, देवेंद्र पाटील, सुमित राजपूत, महेश शिंगणे, तुषार धनगर, पूजा खैरनार, वैष्णवी बागुल या विद्यार्थ्यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली. या रॅलीत महाविद्यालयाचे विद्यार्थी, कर्मचारी वृंद तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते. रॅलीचे समन्वयक म्हणून डॉ. जमीर खान आणि प्रा. प्रेमकुमार बाविस्कर यांनी काम पहिले. रॅली यशस्वितेसाठी क्रीडा विभाग प्रमुख प्रा. वाय. बी. ठाकूर, कपिल धनगर, हिम्मत पवार, यांनी प्रयत्न केले.

### अवकाळीने कांदा लागवड लांबणीवर

नाशिक । कसमादे भागात विशेषतः बागलाण व कळवण तालुक्यात उन्हाळी कांदा प्रमुख नगदी पीक असून चालू वर्षी कांदा लागवड सुरू होण्यापूर्वी अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावल्याने कांदा लागवड खोळंबली आहे. शेतात अजूनही चिखल असल्यामुळे परिपक्व झालेली रोपे आणि आर्थिक उत्पन्नाचा महत्त्वाचा स्रोत असलेला हंगाम वाया जाण्याची भीती व्यक्त होत आहे. बियाणे, दुबार मशागतीच्या भांडवली खर्चात वाढ अशा दुष्टचक्रात सापडलेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी दुष्काळात तेरावा महिना अशी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. यंदा जिल्ह्यात कमी अधिक प्रमाणात पाऊस पडला, अर्थकारणाला चालना देणाऱ्या उन्हाळी कांद्यासाठी दिवाळीपूर्वी रोपे टाकली. महागडी बुरशीनाशक व कीडनाशकांची फवारणी करून ती कशीबशी जगवली.

# आर. सी. पटेल अभियांत्रिकीत प्रथम वर्ष अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी पालक-शिक्षक मेळावा संपन्न

**शिरपूर । प्रतिनिधी**



शिरपूर एज्यूकेशन सोसायटी संचलित आर. सी. पटेल अभियांत्रिकी या स्वायत्त महाविद्यालयाच्या ॲप्लाईड सायन्सेस अँड ह्युमॅनीटीज विभागाच्या विद्यार्थ्यांचा पालक-शिक्षक मेळावा नुकताच यशस्वीरीत्या संपन्न झाला.

दैनंदिन अध्ययन आणि अध्यापन, स्वायत्त अभियांत्रिकी शैक्षणिक कार्यप्रणाली, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणी तसेच विद्यार्थ्यांची हजेरीचे प्रमाण, प्रथम घटक चाचणीचा निकाल, महाविद्यालयातील विविध शैक्षणिक उपक्रम यावर विस्तृत चर्चा सदर पालक-शिक्षक मेळाव्यात घेण्यात आल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली. आर. सी. पटेल अभियांत्रिकी या स्वायत्त दर्जा प्राप्त महाविद्यालयाच्या नवनवीन उपक्रमाचा भाग म्हणून प्रत्येक पालकाला आपल्या पाल्याची प्रगती समजावी व तसेच त्याच्या इंजिनीअरिंग अभ्यासक्रमाचा प्रगतीचा आलेख प्रत्येक पालकांना कळावा म्हणून पालक, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यात ॲप्लाईड सायन्सेस अँड ह्युमॅनीटीज विभागामार्फत २ डिसेंबर रोजी सुसंवाद झाला.

या कार्यक्रम प्रसंगी शाखानिहाय असलेल्या सर्व तुकडी नुसार पालकांना वर्गीकृत करून संबंधित वर्ग-शिक्षक आणि लोकल गार्डीयन यांनी महाविद्यालय सुरु झाल्यापासून ते आतापार्यंतचा सर्व शैक्षणिक लेखाजोखा पालकांसमोर पीपीटी प्रेझेन्टेशनद्वारे सादर केला. यांत हजेरीचे प्रमाण, घटक चाचणी-१ मधील प्राप्त गुण, तसेच विद्यार्थ्यांना पुढील वर्षात प्रवेश मिळविण्याकरिता आवश्यक क्रेडीट आणि ग्रेड्स याची सहज पद्धतीने माहिती करवून दिली. याचबरोबर विद्यार्थ्यांना इंजिनीअरिंगच्या शिक्षणातून अंतिम वर्षी होणाऱ्या कॅम्पस प्लेसमेंटद्वारे नोकरीची संधी साध्य करण्यासाठी, तसेच प्रत्येक विद्यार्थ्यांला हमखास प्लेसमेंट मिळवण्यासाठी महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांकडून प्रथम वर्षापासूनच करवून घेतली जाणारी तयारी व प्रशिक्षण वर्गाबद्दल पालकांना माहिती देऊन आवश्यक बाबींवर चर्चा झाली.

मेळाव्याच्या अंतिम टप्प्यात पालकांनी संबंधित विषय शिक्षकांना वैयक्तिक भेटून त्यांच्या पाल्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेत आवश्यक बाबींवर चर्चा केली. या मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी कार्यक्रमाचे अध्यक्ष विभागप्रमुख डॉ. एस. व्ही. देसले यांच्या मार्गदर्शनाखाली समन्वयक डॉ. किशोर ठाकरे आणि ॲप्लाईड सायन्सेस अँड ह्युमॅनीटीज विभागाचे सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष प्रयत्न केले. महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, परीक्षा नियंत्रक प्रा. सुहास शुक्ल, विभाग प्रमुख प्रा. डॉ. नितीन पाटील, प्रा. जी. व्ही. तपकिरे, प्रा. डॉ. व्ही. एस. पाटील, प्रा. पी. एल. सरोदे, डॉ. एस. व्ही. देसले, डॉ. आर. बी. वाघ, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. एम. पी. जैन, जनसंपर्क अधिकारी डॉ. प्रशांत महाजन तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# गारपिटीचे संकट सरले, पण राज्यात पसरली धुक्याची चादर

**नाशिक । प्रतिनिधी**

अवकाळी पाऊस, गारपिटीनंतर वातावरणात सुधारणा होत असतानाच राज्यात अचानक आलेल्या दाट धुक्यामुळे शेतकऱ्यांच्या चिंतेत अजून भर पडली. अरबी समुद्रावरून आलेले वारे आणि ढगाळ हवामानामुळे वाढलेली आर्द्रता याचा परिणाम म्हणून शुक्रवारी सकाळी राज्याच्या काही भागात दाट धुक्याची लहर पसरली होती. त्यामुळे १५ ते २० फूट अंतरावरील दिसत नव्हते. आगामी दोन दिवस असेच वातावरण राहिल, त्यानंतर धुके कमी होण्याची शक्यता असल्याचा अंदाज हवामानतज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी वर्तविला आहे. धुक्यामुळे गारपीटीच्या तडाख्यातून उरलेल्या पिकांवर रोगराई पसरण्याची चिंता निर्माण झाली आहे.

दरम्यान, पावसाळी वातावरण हळूहळू निवळत असून उत्तर महाराष्ट्र, पश्र्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि कोकण या भागात किमान आणि कमाल तापमानात दोन ते तीन अंश सेल्सियसने घट होत आहे. त्यामुळे वातावरणामध्ये गारवा जाणवत आहे. कोकण -मुंबईसह कोकणात फक्त ढगाळ वातावरण राहिले.



# दिव्यांग म्हणजे सकारात्मकता ऊर्जा स्रोत, दिव्यांगाच्या कल्याणासाठी प्रशासन सदैव तत्पर

## नाशिक जि.प मुख्य कार्यकारी अधिकारी अशिमा मित्तल यांचे प्रतिपादन




















नाशिक।
दिव्यांगाना अनेक प्रश्र्नांना सामोरे जावे लागते. मात्र त्यावर ते मात करून आपली वाटचाल करीत आहेत, त्यामुळे ते सकारात्मक ऊर्जा स्त्रोत असून या दिव्यांगाच्या कल्याणासाठी प्रशासन सदैव तत्पर असल्याचे प्रतिपादन नाशिक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अशिमा मित्तल यांनी केले आहे.जागतिक दिव्यांग दिनानिमित्त जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग नाशिक व महापालिका नाशिक यांच्या वतीने येथील कालिदास कला मंदिर येथे आयोजित कार्यक्रमाप्रसंगी त्या बोलत होत्या दिव्यांगांमध्ये निश्चितच सर्व सामान्याप्रमाणे गुणवत्ता असून त्यांना देखील व्यासपीठ मिळणे आवश्यक आहे. विविध संस्थांच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या  विविध कार्यक्रमातून त्यांना व्यासपीठ उपलब्ध होत आहे ही निश्र्चितच अभिनंदनीय बाब आहे, असेही मित्तल यांनी सांगून उपस्थित सर्वांना दिव्यांग दिनाच्या शुभेच्छा दिल्यात. तसेच विविध संस्थातील गुणवंत दिव्यांग विद्यार्थ्यांचा सन्मान देखील यावेळी त्यांच्या हस्ते करण्यात आला. जैन सोशल मेन ग्रुप नाशिकच्या वतीने दिव्यांग विद्यार्थ्यांना १००० ब्लँकेटचे देखील वाटप मान्यवरांच्या हस्ते याप्रसंगी करण्यात आले.सकाळी दिव्यांग विद्यार्थ्यांनी शहरातून रॅली काढली होती. कॉलेज ऑफ फिजीओथेरेपीच्या विद्यार्थ्यांनी याप्रसंगी पथनाट्यच्या माध्यमातून दिव्यांग अधिनियमातील तरतुदीचे विवेचन केले. याप्रसंगी रविंद्र परदेशी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, योगेश पाटील, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, हर्षल नेहते, जिल्हा आरोग्य अधिकारी, प्रशांत पाटील, उपायुक्त समाज कल्याण विभाग मनपा, नाना शिंदे, योगेश वाणी, ईश्र्वर कुमावत अशासकीय सदस्य, जिल्हा दिव्यांग कल्याण समिती, अशोक कटारिया, जैन सोशल मेन ग्रुप नाशिक, शशिकांत पाटील जनसंपर्क अधिकारी समाज कल्याण विभाग, प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेचे, ललित पवार, बबलू पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

दैनिक
लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक
मंगळवार दि. ५ डिसेंबर २०२३




# आझाद समाज पार्टीचे धुळ्यात चक्काजाम आंदोलन

























धुळे । साक्री तालुक्यातील विटाई गावातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास तत्काळ प्रशासकीय मान्यता द्यावी, यासह विविध मागण्यांसाठी आझाद समाज पार्टीतर्फे शहरातील संतोषी माता चौकात रास्तारोको आंदोलन करण्यात आले. संघटनेचे कार्याध्यक्ष आनंद लोंढे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात विटाई ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. जिल्हाधिकारी आणि पोलिस प्रशासनाला मागण्यांचे निवेदन देण्यात आले. १४ डिसेंबरपर्यंत मागण्या मान्य झाल्या नाही तर १५ डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजेपासून विटाई ग्रामस्थ व आंबेडकर समुदायाचे विविध पक्ष, संघटनासह भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याजवळ बेमुदत आमरण उपोषण केले जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.रास्तारोको आंदोलनात आनंदलोंढे यांच्यासह जिल्हाध्यक्ष आबा अमृतसागर, मुकुंदराव शिरसाठ, समाधान झाल्टे, कुलभुषण वाघ, महेंद्र सोनवणे व ग्रामस्थ सहभागी झाले होते.

संकलन : दिपक वाघ